सन १९४६

मङ्गल साहित्य प्रकाशन · ९




१३४६
म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. २९५५

REFBK-0006714

# अज्ञाताची वावटळं

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०११८

मङ्गल साहित्य प्रकाशन : ९

# अज्ञाताचीं वचनें

भाग पहिला

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ६७१४
REFBK-0006714

प्रथमावृत्ति- अक्षय्यतृतीया संवत् २००१

द्वितीयावृत्ति- अ० चैत्र शु० ११, संवत् २००२

मूल्य सव्वा रुपया : संचालक- अमरेन्द्र गाडगीळ

प्रकाशिका :- सौ. मङ्गला अमरेन्द्र गाडर
५२३ सदाशिव पेठ, पुणें २.

सर्वाधिकार लेखकाधीन.

मुख्य विक्रेते-
अभिनव पुस्तकमंदिर,
फर्ग्युसन मार्ग, आम्रराई,
पुणें ४.

मुद्रक :-
लक्ष्मण नारायण चापेकर,
'आर्यसंस्कृति मुद्रणालय'
१९८/१७ सदाशिव पेठ,
टिळक रस्ता, पुणें २.

परमपूजनीय

# डॉ. हेडगेवार

यांच्या पवित्र नि स्फूर्तिदायी

स्मृतीस

**सप्रेम सादर समर्पित**

—अज्ञात

## प्रिय बन्धु-भगिनी !

"केसरी" पत्रांतून प्रसिद्ध झालेल्या माझ्या लिखाणासंबंधीं विचारणा आजवर अनेकांनीं केलेली आहे. तें लिहिणें, माझ्या मना-विरुद्धच, जेव्हां मला थांबवावें लागलें तेव्हां अनेकांची निराशा झाली हेंहि मला कळलें. तेव्हां त्या लिखाणाचा, त्यांत अधिक भर घालून व कांहीं सुधारणा करून, एक संग्रहच प्रसिद्ध करावा असा कांहीं चाहत्यांनीं आग्रह चालविला. तें मलाहि मान्य झालें. त्यानुसार हा संग्रह आपल्या हातीं देत आहें.

अर्थात् करमणुकीसाठीं मीं हें लिहिलेलें नाहीं; व तसें लिहिणारहि नाहीं. आपल्या प्रत्यक्ष कार्यांत या माझ्या शब्दांचा कांहीं उपयोग झाला तर मी मला धन्य समजेन. त्याच हेतूनें हा खटाटोप विशेषत: केला. तरी हें केवळ सूत्रमयच आहे.

असेंच आणखीहि कांहीं लिहावें म्हणतों; आपण आपला अभि-प्राय– खरा नि स्पष्ट– कळवाल का ? आभारी होईन.

—**अज्ञात**

---

कृतज्ञता : या प्रकाशनासाठीं आर्थिक साहाय्य करणारे "अज्ञाता"चे एक स्नेही आणि इतर अनेक परींनीं साहाय्यभूत झालेले दुसरे एक स्नेही यांचें ऋण अपार आहे. त्याविषयांची कृतज्ञता शब्दांत वर्णणें इष्ट नव्हे; म्हणून केवळ आभार.

—प्रकाशिका

दुसऱ्या आवृत्तीची संधि उदार नि जाणत्या वाचकवर्गानें आम्हांस इतक्या थोड्या अवधींत आणून दिल्याबद्दल साभार आनंद व्यक्त:करणें हें आम्ही आमचें कर्तव्य समजतों.

—प्रकाशिका

ग्रा. क्र. ६७१४

# अज्ञाताच्या मनोमंदिरांतील पडसाद

'अज्ञाता'ला येथें जे कांहीं अगदीं स्वतःच्या अंतःकरणांतील विचार मांडावयाचे आहेत ते राष्ट्रीय म्हणजे हिंदुसंघटकांसाठीं व विशेषतः त्यांतील तरुण मनाच्या संघटकांसाठीं आहेत. हिंदुस्थानांतील आजचें वातावरण धगधगायमान झालेलें असून त्यांत कशा-कशाची आहुति पडणार आहे तें कांहीं आज सांगतां येत नाहीं. अशा वेळीं कोणाहि राष्ट्रीय तरुणाचें मन स्वस्थ राहणें केवळ अशक्य आहे. 'इतकें भयंकर घडत असतांना मी त्यापासून दूर, स्वस्थ कसा राहूं?' असा प्रश्न प्रत्येक देशभक्त अंतःकरणांत निर्माण होत आहे. अगदीं नैसर्गिक, सहजसुलभ नि योग्यच आहे तें !— परंतु संघटने-च्या शास्त्रशुद्ध स्वरूपावर ज्यांचा विश्वास आहे किंवा त्या मार्गाचें रहस्य समजून घेण्याची ज्यांची प्रामाणिक इच्छा आहे अशा माझ्या देशबांधवांशीं चार शब्द बोलावेत' असें अगदीं अंतःकरणापासून वाटतें. अगदीं स्वच्छ व स्पष्ट दृष्टीनें माझ्या या म्हणण्याचा विचार माझे बंधु करतील का? माझी तशी फार फार इच्छा आहे. कारण माझेंहि अंतःकरण तुमच्यासारखेंच पेटलेलें आहे.

आपण हें जाणूं शकतों कीं, हिंदुस्थानांतील ३५ कोटींच्या ३५ कोटि हिंदु समाज सारा केव्हां तरी एकदां पूर्ण संघटित होईल नि मग हिंदुराष्ट्र स्वतंत्र होईल ही खुळी कल्पना आहे. तसें कधींच घडणार नाहीं. परंतु राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्यासारख्या महत्त्वाच्या गोष्टीसाठीं राष्ट्राची कांहीं एका विशिष्ट मर्यादेपर्यंत सर्वसामान्य सिद्धता व्हावी लागते. आणि ही सिद्धता कांहीं दोन आणि चार दिवसांत नि केवळ भावनेच्या जोरावर होऊं शकत नाहीं. कोणतेंहि काम घडवावयाचें तर त्यासाठीं शक्तीची आवश्यकता असते हा पदार्थविज्ञानशास्त्राचा साधा नियम राष्ट्रप्रपंचामध्यें तर अवश्य लागू पडतो. ही शक्तिच नसेल तर कोणी झाला तरी काम कसें पार

पाडणार ! तत्त्वज्ञान मोठें उदात्त नि तेजस्वी असलें तरी त्याला व्यवहारांत उतरविण्यासाठीं कांहींतरी शक्तीचें पाठबळ असल्याविना चालत नाहीं. आणि आजच्या कालांत तर विशेषतः संघटित असणें हीच फार प्रचंड अशी शक्ति आहे.

कोणतीहि राष्ट्रीय संघटना घ्या. तें राष्ट्र विघटित नि परतंत्र असेल तर बलशाली राष्ट्राची निर्मिति हेंच ध्येय त्या संघटनेचें असतें. आणि जर तें राष्ट्र स्वतंत्र असेल तर त्याचें संघटित सामर्थ्य, जिवटपणा व जोम चिरंतन नि भरदार राखणें हा उद्देश त्या राष्ट्रीय संघटनेपुढें असतो. पारतंत्र्याचा रोग बरा करण्यासाठीं केवळ राजकीय केवळ सामाजिक वा केवळ धार्मिक अशी कोणतीच एकेरी औषधयोजना करून भागत नाहीं. रोगाचें मूळच खणून काढणारी सर्वंकष संघटनेची रामबाण मात्रा त्यावर द्यावी लागते. कारण एका पारतंत्र्याच्या रोगाबरोबर राष्ट्रपुरुषाच्या शरीरांत अनेक लहानमोठे, साधे व भयंकर असे इतर रोगहि वस्ती करूं लागतात. त्याला एकच औषध. राष्ट्रघटकांना स्वत्वाची जाणीव करून देऊन त्यांची संघटना करणें.

मात्र हें औषध घ्यावयाचें तर पथ्यें फार कडक सांभाळावीं लागतात. त्याचें अनुपानहि फार मौल्यवान् नि तितकेंच जहर कडू आहे. तें पथ्य नि अनुपानहि या पुस्तकांत यथाक्रम सांगितलें आहे. औषध कडक असल्यानें काळजीपूर्वक पथ्य सांभाळलें तरच तें गुण देईल एवढी सूचना मात्र अवश्य द्यावीशी वाटते !

सागर भयंकर खवळला आहे ! या तडाख्यांत आपल्या भारताची राष्ट्रनौका कोठेंतरी आपटून फुटून जाईल कीं काय अशी शंका कित्येकांना भेडसावीत आहे. आणि याच वेळीं कर्णधारानें आपल्या जागीं स्थिर राहून अचल मनानें या आतंकांतून ही नौका सुरक्षित राखली पाहिजे. याच वेळीं या नौकेवरील प्रत्येक लहानमोठ्या नावाड्यानें नि इतर कामकऱ्यानें हें अवश्य लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, आतां

क्षणमात्रहि आपण आपली जागा सोडून चालणार नाहीं. नौकेला भोंक पडलें आहे; पडूं द्या! आपल्यांपैकीं कोणीहि आपली जागा सोडण्याची आवश्यकता नाहीं; सोडणें घातक ठरेल. भोंक पडलें असतां तें बुजविण्याचें दायित्व सर्वांवर असलें तरी तें विशेष काम नौकेचा कर्णधार ज्याला सांगेल तो तें करील. साऱ्यांनींच त्या भोंक पडलेल्या जागेकडे धांव ठोकल्यास व्यर्थ गोंधळ माजेल, नौकेची इतर कामें बंद पडतील आणि ही नौका आणखी एकाद्या भयानक खडकावर आदळून तिचा चक्काचूर होऊन जाईल!

नौकेवर शत्रूचा हल्ला झाला आहे म्हणतां? तरी चिंता नाहीं! नौकेवरील सैनिक लढतील. ते कमी पडतात असें वाटतांच आपल्यांपैकीं साऱ्यांनाच साद घातली जाईल; पण ती निकराची म्हणून! तोंपर्यंत ज्यानें त्यानें आपापलें कर्तव्य बजावीत शत्रूकडून होणाऱ्या अग्नीच्या वर्षावांतहि अविचल उभें राहिलें पाहिजे; तरच ही नौका वांचेल. ही नौका या भयंकर वादळांतून संरक्षून इष्ट स्थळीं त्वरेनें नेण्याचें दायित्व कर्णधारानें पत्करलें आहे: त्यावर प्रत्येक नावाड्याचा विश्वास— पूर्ण विश्वास— असला पाहिजे हेंच संघटनेचें मर्म. घटकांचें स्थान व कार्य नेत्यानें ठरवावयाचें असतें. सारे सेनापति असूं शकत नाहींत; तें कधींच हितकर ठरत नाहीं! आज्ञांकित शक्ति हें अतर्क्य सामर्थ्य आहे.

राष्ट्रीय स्वातंत्र्याचा लढा म्हणजे जोहार नव्हे! आत्मयज्ञ करणें हें कांहीं देशभक्ताचें ध्येय असूं शकत नाहीं; तर तो ज्यासाठीं करावयाचा त्याबाबत कांहीं तरी उदात्त हेतु असावा लागतो. सहस्रांनीं जोहार करणारे राजपूत वीर वंदनीय योद्धे खरे; पण त्यांनीं स्वतः-बरोबरच आपल्या तत्कालिन राष्ट्राची आहुति दिली! ती दुर्घटना इतिहासवाचकांना विदित आहे. येथें मराठ्यांचा गनिमी कावा हवा. जें घडवावयाचें तें न बोलतां, त्याचा निष्कारण गाजावाजा न करतां, या कानाचें त्या कानाला न कळूं देतां घडलें पाहिजे.—रा. दू. अं.

दूरपर्यंत भविष्यकालांत दृष्टि पोंहोचावी लागते. ती ज्यांना लाभते, ते द्रष्टे! द्रष्टयाच्या दृष्टींतून पाहावयास शिकलें पाहिजे. संघटनेच्या प्रत्येक पांथिकाला आपलें दूरचें क्षितिजावरचें अंतिम ध्येय स्पष्ट दिसत असलें पाहिजे. नाहींपेक्षां तो स्वतःची नि त्याबरोबरच इतरांचीहि फसगत करील. असें घडूं नये याविषयीं दक्षता घ्यावयास पाहिजे.

राज्यक्रान्ति हा शास्त्रशुद्ध राष्ट्रीय संघटनेच्या उत्क्रांतिमार्गावरील एखादा अपघात किंवा प्रसंग असतो. राष्ट्रीय संघटना कोणत्याहि विशिष्ट बिंदूकडे धांवत नसते; तिची गमनदिशा मात्र निश्चित ठरलेली असते. बंदुकीची गोळी एकदम उडून जावी नि तिनें आपलें जीवन संपवावें तशी राष्ट्रीय संघटना नसते; तर ती अखंड ज्योतिस्वरूप असली पाहिजे. राष्ट्राच्या या समईंत परिश्रमांचें तेल एकसारखें घालीत ती सातत्यानें जळत ठेवावी लागते. मग त्या कार्यांत अनेक व्यक्तींचाच काय पण पिढीच्या पिढीचा होम झाला तरी चिंता नाहीं! कारण ही भावी पिढ्यांसाठीं तजवीज असते. या संघटनेचें स्वरूप व कार्य भुरुभुरु जळून जाणाऱ्या शोभेच्या दारूसारखें क्षणजीवी नाहीं; तें अखंड व दैनंदिन कार्य असतें. समाजापासून अलग असें अमानुष किंवा अतिमानुषहि तिचें स्वरूप नसतें. तर समाजाशीं संलग्न व मानवी व्यवहारांत क्षणोक्षणीं प्रत्यक्ष प्रतीत होणारें असेंच तें असलें पाहिजे. कारण राष्ट्रीय संघटना ही समाजापासून दूर सरलेल्या संन्याश्यांची वा पददलित बद्धांचीहि असूं शकत नाहीं; तर आपल्या ध्येयपथावर नीट अवधान राखून चालणाऱ्या, अभ्युदयानंतर निःश्रेयसाकडे जाणाऱ्या सर्वसामान्य पथिकांची ती असली पाहिजे. केवळ एखादुसरा महापुरुष जन्माला येण्यानें कोणतेंहि राष्ट्र उदयाला येत नाहीं. अनेक राष्ट्रीय स्वयंसेवक निर्माण केल्यानें मात्र राष्ट्राचा ऊर्जितकाल निश्चित होऊं शकतो.

आतां आमच्या या राष्ट्राला हुतात्मे नकोत; या अखंड राष्ट्रीय

यज्ञांत आपल्या भावनांचा नि कष्टांचा हविर्भाग सातत्यानें, शिस्तीनें, सूत्रबद्धतेनें अर्पिणारे ज्वलन्त जीव हवे आहेत. हुतात्मे निर्माण होणें हें कोणत्याहि राष्ट्राला गौरवास्पद असलें तरी हुतात्म्यांची निर्मिति समाजाच्या दुर्बलत्वांतून होत असते, हेंहि विसरतां येणार नाहीं. हुतात्मे होण्याच्या पात्रतेचे नि सिद्धीचे अनेक राष्ट्रीय आत्मे जिवंत राखून ठेवणें आवश्यक असतें. त्यांचें हवन केव्हां, कोठें नि कसें करावयाचें तें योग्य समयीं योग्य तीं माणसें ठरवितील. शक्ति खर्चण्याला वेळ लागत नाहीं, तें सोपें आहे; त्याची घाई नको. शक्तिसंचय करण्याला मात्र अनेक वर्षे नि अनंत परिश्रम लागतात. त्या कार्याचा वेग वाढविला पाहिजे.

"मेळविती तितुकें भक्षिती । ते कठीण काळीं मरोनि जाती ।
दीर्घसूचनेनें वर्तती । तेचि भले ॥"

ही समर्थांची उक्ति विसरलों तर पस्तावा करण्याची पाळी येईल !

— २९ ऑगस्ट १९४२, पुणें

"जनासो अग्निं दधिरे सहोवृधं विधेम ते ।
स त्वं नो अद्य सुमना इहाविता वाजेषु सन्त्य ॥"

—ऋग्वेद

—दर्प-दमन सामर्थ्याची वृद्धि करणारा जो अग्नि त्याची भक्तजनांनीं वेदीवर संस्थापना केली आहे. त्यास हवि अर्पण करून आम्हीहि त्याला प्रकट व्हावयास लावूं. हे सत्प्रतिपालका अग्निदेवा, पराक्रमाच्या कृत्यांत आमचा तूं प्रसन्न अंतःकरणानें संरक्षणकर्ता हो.

# मंजुल साहित्य प्रकाशन

(संचालक: — अमरेन्द्र गाडगीळ)

| | | |
|---|---|---|
| (१) अखण्ड भारतच कां ? (ले. 'हेमाग्रज') | | २॥ रुपये |
| (२) राष्ट्रसेवकाची शिदोरी ... | ... | १। रुपया |
| (३) अज्ञातकी वाणी (हिंदी) ... | ... | १ रुपया |
| (४) दीक्षा (यतीश यांचा काव्यसंग्रह) | ... | १॥ रुपया |
| (५) अज्ञाताचीं वचनें भाग १ ला (दुसरी आवृत्ति) | | १। रुपया |
| (६) हिंदूंच्या सामाजिक अवनतीची मीमांसा— (ले. लाला हरदयाळ) | | ५ आणे |
| (७) प्रवासी राम (ले. अमरेन्द्र) | ... | आगामी |
| (८) गप्पागोष्टी (ले. अमरेन्द्र) | ... | आगामी |
| (९) ? ? ? (ले. अमरेन्द्र) | ... | ,, |
| (१०) अज्ञाताचीं वचनें भाग २ रा | ... | ,, |
| (११) संताजी घोरपडे (ले. ना. ह. पालकर) | | ,, |
| (१२) आमचे राष्ट्रगुरु (ले. गोपाल) | ... | ,, |

एकमेव विक्रेते : अभिनव पुस्तकमन्दिर,

फर्ग्युसन मार्ग, आम्बराई, पुणें ४.

निर्वाह
दा. क्र. ६०७४



## राष्ट्र म्हणजे संघटित समाज

हें 'राष्ट्र' 'राष्ट्र' ही चीज आहे तरी काय? आपण विचाराल. काय, हे सह्याद्रीच्या अंगावर पसरलेले दगडधोंडे नि नद्यानाले म्हणजे राष्ट्र कीं हीं चालतींबोलतीं माणसें म्हणजे राष्ट्र? काय, आहे तरी काय, राष्ट्र म्हणजे?

राष्ट्र या शब्दाची व्याख्या अद्यापि सर्वसंमत अशी झालेली नाहीं. तथापि आपली हिंदुसंघटनवाद्यांची राष्ट्रकल्पना मूलतः सांस्कृतिक स्वरूपाची आहे. एक इतिहास, एक परंपरा, एक संस्कृति, एक धर्म, इत्यादि कांहीं सर्वसामान्य (common) बंधांनीं एकत्र झालेला विशिष्ट भूभागावरील संघटित समाज म्हणजे राष्ट्र, असें सर्वसामान्यपणें म्हणतां येईल. नुसते दगडधोंडे वा नुसतीं माणसें हें कांहीं राष्ट्र होऊं शकत नाहीं. हे दगडधोंडे, ही भूमि, ही संस्कृति, हा इतिहास 'माझा आहे', असें स्वाभिमानपूर्वक ज्या समाजाला वाटतें तो राष्ट्रकल्पनेच्या परिसरांत आला असें म्हणावयास कांहीं प्रत्यवाय नाहीं. परंतु त्या संस्कृतीच्या नि भूमीच्या रक्षणवर्धनासाठीं प्रसंगीं वाटेल त्या त्यागाची सिद्धता ठेवणारा संघटित नि जागरूक समाज म्हणजे खरेंखुरें राष्ट्र.

यासाठीं समाजांतील जास्तींत जास्त घटकांत ही जाणीव निर्माण करणें हें पहिलें काम. एकदां अशी दृष्टि निर्माण झाल्यानंतर मोठे गहन नि कठिण वाटणारे सामाजिक, धार्मिक, राजकीय सारे सारे प्रश्न आपोआप सुटूं लागतात.

आतां आपल्या हिंदुराष्ट्राच्याच दृष्टीनें विचार करावयाचा तर, साक्षरताप्रसार, शेतकऱ्या-कामकऱ्यांची संघटना, अस्पृश्यतानिवारण, धर्मान्तरितांची शुद्धि, अनिष्ट रूढींचें उच्चाटण, असे एक ना हजार प्रश्न आपल्या या प्रिय राष्ट्राचें कार्य करावयास निघालेल्या माणसापुढें

दत्त म्हणून उभे राहातात. पण या प्रश्नांच्या फांद्या ज्या मूळ वृक्षापासून उत्पन्न झाल्या आहेत त्या वृक्षाच्या मुळावरच घाव घातला म्हणजे या वेगवेगळ्या फांद्या तोडण्याचे परिश्रम नि कालापव्ययहि होणार नाहीं. कारण राष्ट्रीय संघटनेची जाणीव एकदां कोणाहि घटकाच्या अंतःकरणांत उत्पन्न झाली म्हणजे तो आपले सारे व्यवहार त्या जाणिवेनुसारच करीत राहील. उदाहरणच घ्यावयाचें तर, अशी राष्ट्राच्या एकत्वाची, समानत्वाची, संघटित जीवनाची स्पष्ट जाणीव एका मोठ्या कारखानदाराला झाली नि त्याच वेळीं ती त्याच्या कारखान्यांत काम करणाऱ्या कामगारांनाहि झालेली असली तर वर्गकलह निर्माण होण्याची शक्यता आहे का? किंवा पूर्वीं उत्पन्न झालेली असेल तर तो परस्परसहानुभूतीच्या नि प्रेमाच्या आंचेनें वितळून जाणार नाहीं का?

अस्पृश्यतानिवारणासारखे इतरहि अनेक प्रश्न राष्ट्रापुढें आहेत. पण ते संघटनेनें आपोआप सुटतात. जसें भगवान् श्रीकृष्णाच्या शरीरांत विश्वाचें विराट् दर्शन घडलें तद्वतच राष्ट्रांतील सर्व लहान-मोठ्या व्यवहारांचें विराट् दर्शन संघटनेच्या अनंत स्वरूपांत अवश्य दिसतें. उपमाच द्यावयाची तर तीन पावलांनीं त्रिलोक व्यापून टाकणाऱ्या वामनाची देतां देईल. संघटनेचा हा वामनावतार लहान दिसत असला तरी त्याच्या ठिकाणच्या शक्तीसंबंधीं शंका बाळगण्याचें कारण नाहीं. समाजांतील एकाद्याच प्रश्नापुरती संघटनेची दृष्टि संकुचित असून चालत नाहीं; तशी दृष्टि असेल तर ती एक संस्था म्हणावी लागेल. संस्था आणि संघटना यांत महदंतर असतें. संस्था (institution) कांहीं विशिष्ट मर्यादित प्रश्नांचा विचार व व्यवहार करीत असते; ती सान्त असते. उलट संघटनेच्या (organization) व्यापाला मर्यादा नाहीं; ती अनन्त असते. एकाद्या व्यक्तीसाठीं, एकाद्या विशिष्ट प्रश्नासाठीं, एकाद्या विशिष्ट परिस्थितीसाठीं ती निर्माणच झालेली नसते. तिचें असणें, अस्तित्व हाच स्वभाव; हीच

तिची प्रकृति. यास्तव अस्पृश्यतानिवारण हें जसें हिंदुस्थानाच्या राष्ट्रीय संघटनेचें ध्येय असूं शकत नाहीं, तद्वतच राष्ट्रीय स्वातंत्र्य हेंहि केवळ त्या संघटनेचें ध्येय असणार नाहीं. राष्ट्रीय स्वातंत्र्य ही परमावश्यक नि अपरिहार्य स्थिति असून ती प्राप्त करून घेणें हें कर्तव्य त्या त्या राष्ट्रांतील प्रत्येक संघटनेचें असतेंच. पण हिंदुस्थानांतील राष्ट्रीय संघटनेमुळें केवळ या राजकीय साध्यावरती तृप्त राहातां येत नाहीं. मानव्याचें कल्याण नि समृद्धता हें त्या संघटनेचें अंतिम ध्येय असूं शकतें. पण त्यासाठीं प्रथम आपलें स्वतःचें राष्ट्र पूर्ण वैभवशाली करणें आवश्यक आहे. (अप्रकाशित)

* * *

## हीच निर्वाणीची हांक

राष्ट्र म्हणजे त्यांतील राष्ट्रीय समाज वैभवाला नेणें याचा तरी काय अर्थ ? विद्या-कला, द्रव्य-बल इत्यादींनीं या राष्ट्रांतील राष्ट्रीय समाजाचें जीवन समृद्ध होणें, त्याचें जगांतील योग्य तें स्थान त्याला पुन: मिळणें, त्याचें उदात्त नि प्रभावी तत्त्वज्ञान व संस्कृति जगावर सर्वत्र विस्तार पावणें ही हिंदुराष्ट्राच्या वैभवाची कल्पना आहे. शरीरानें व तसाच मनानेंहि जो मनुष्य सुदृढ, निकोप नि समृद्ध असेल त्याचें जीवन आपण आदर्श समजतों; तद्वतच राष्ट्राचें शरीर म्हणजे बल किंवा सैन्यशक्ति, आणि मन म्हणजे समाजांतील एकराष्ट्रीयत्वाची भावना यांवर राष्ट्राचें वैभव अजमावितां येतें. स्वसंरक्षण आणि जातीचें रक्षण करण्यास समर्थ इतकें भौतिक सामर्थ्य आणि मानवाच्या सुख-समृद्धीसाठीं झटण्याची प्रामाणिक नि कार्यकारी इच्छा ही दैवी शक्ति या हिंदुराष्ट्रांत निर्माण व्हावी असाच हेतु हिंदुराष्ट्रवादी संघटकांचा आहे. "येतील जगांतिल राष्ट्रें । वंदितील भारतमाते । करुनियां स्पर्श चरणातें ।" असा "सोन्याचा वासर" आपल्याला दिसावा अशीच थोर इच्छा त्या संघटकांनीं आपल्या अंतःकरणांत सदैव बाळगिलेली आहे. आणि ती पुरी करण्यासाठीं आवश्यक तर सर्वस्वाचा

होम करावयासहि ते कटिबद्ध झालेले आहेत. त्याकरितां अखंड जळत राहाण्याचें वीरव्रत त्यांनीं घेतलें आहे. अशा लक्षावधि व्रतधारकांपैकीं आपणहि एक व्हावें असें नाहीं का आपल्याला वाटत ?— कारण त्यांनीं जें कार्य आरंभिलें आहे त्यांत त्यांचा किंचित्‌सुद्धां स्वार्थ नसून उलट ते स्वीकृत कार्यांत यशस्वी होण्यामध्यें आपल्यांपैकीं प्रत्येकाचा गौरव, मोठेपणा नि स्वास्थ्य आहे. मग या अखंड चाललेल्या राष्ट्रीय यज्ञांत जें कांहीं लहान वा मोठें काम आपण करूं शकाल, तें करण्या-साठीं तत्परतेनें आपण स्वतःच पुढें व्हावयास नको का ? उद्यांच्या स्वतंत्र नि वैभवशाली हिंदुराष्ट्रांत आपल्याला नागरिकत्वाचा अधिकार तर अवश्य पाहिजे असणार. मग त्या वेळीं तो अधिकार अपेक्षिण्या-साठीं आज कांहीं कृति, तें फळ चाखण्यासाठी आज या हिंदु-राष्ट्राच्या रोपट्याची कांहीं जोपासना करणें हें आपलें कर्तव्य असत नाहीं का ?

"जो अन्न देतो उदरासी । शेरीर विकावें लागे त्यासी ।
मां जेणें घातलें जन्मासी । त्यासी कैसें विसरावें ।।"

आपल्यापैकीं कित्येक जण २५–३० रुपड्या देणाऱ्या 'साहेबा' ची पोटासाठीं मर्जी सांभाळतां ! 'साहेबा'कडून 'हुकूम' आला कीं इमानी कुत्र्याप्रमाणें धांपा टाकीत त्याच्या पायाशीं 'हजर' होतां. त्या वेळीं 'व्यक्तीचें स्वातंत्र्य', 'व्यक्तीचा मान' सारें सारें चुलखंडांत जातें. आणि आपण ज्या समाजांत लहानाचे मोठे झालांत, ज्या भूमीच्या जीवनावर आपला पिंड पोसला त्या समाजाला नि भूमीला तुच्छतापूर्वक हेटाळून आणि 'आमचा समाजच असा' असला बेमुर्वतपणी शेरा मारून मोकळे होतां. काय, तो समाज 'आपला' आहे या आपुलकीनें कधीं त्याच्या सुधारण्याची कांहीं खटपट, अंगमेहनत केली आहत आपण ? फक्त त्या समाजाचें दोषदर्शन करतांना त्यावर आपला कांहीं अधिकार सांगतां पण दोष घालविण्यासाठीं कांहीं प्रत्यक्ष कार्य करण्याची पाळी आली कीं तो

आपुलकीचा भाव कोठल्या कोठें लोपून, 'झक मारत गेला तो समाज नि तें कार्य' असें मोठ्या दिमाखानें उत्तर देऊन आपण मोकळे होतां ! असें बोलण्यांत आपण कांहीं मोठा शहाणपणा, तत्त्वज्ञानीपणा, संतपणा दाखवितां असेंहि वाटतें आपल्याला ! ! क्षमा करा मला. कठोर बोललों मी अतिशय. पण, खरेंच नाहीं का असें घडत आज ?

प्राप्त परिस्थितीच्या भयानक नि रौद्र स्वरूपाचें दर्शन, नको म्हटलें तरी, आपल्यांपैकीं प्रत्येकाला घडत आहे. परिस्थितीनें आवाहन केलें आहे प्रत्येकाला. आतां भीतीनें, स्वार्थामुळें वा अन्य कशासाठीं मागें सरतील ते निःसंशय राष्ट्रद्रोही समजले जातील ! आवश्यक तर स्वतःच उभारलेल्या प्रासादाला स्वहस्तेंच काडी लावून देण्याची सिद्धता हिंदु म्हणवून घेणाऱ्या प्रत्येकानें यापुढील दर क्षणीं ठेविली पाहिजे; कारण आपल्याला समीपच्या भविष्यांत अखिल हिंदुराष्ट्राचा एकच एक भव्य, गगनभेदी, अभेद्य नि जगाला दिपविणारा तेजोमय प्रासाद उभारावयाचा आहे. हीच निर्वाणीची हांक !

(अप्रकाशित)

* * *

## मेलेल्या कोंबड्याला आगीचें भय कसलें ?

परिस्थितीच्या आसुडाचे निष्ठुर फटके अंगावर बसत असतांहि जागे न होण्याइतकी घोर मोहनिद्रा लागली आहे का आपल्याला ? अहो, आपण या राष्ट्राचे राष्ट्रिक, या राष्ट्राचा धनीपणा खरा आमचा, केवळ आमचाच ! या देशांत मैलोमैल पसरलेली ही सुवर्णभूमि, ही अलोट संपत्ति नि दिगंतांत जिची कीर्ति दुमदुमून राहिली आहे ती काव्यसाहित्यादि दिव्य संपदा हें सारें सारें वैभव, आणि तसेंच जगाला शिरोधार्य असलेली उदात्त संस्कृति नि विश्वव्यापक धर्म हें सर्व वस्तुतः आपलें ! असें असतांना एकाद्या अगणित संपत्ति असलेल्या भाग्यपुरुषाच्या भिकारी व करंट्या पुत्राप्रमाणें आपण कां बरें वागत आहांत ? या जगांत लढल्या-भांडल्याविना कोणी कोणाला

कांहीं देत नाहीं. अगदीं प्रत्यक्ष पाठचा भाऊसुद्धां आपला न्याय्य वांटा आपल्याला सुखानें मिळूं देत नाहीं. असा व्यवहार दैनंदिन जीवनांत अनुभवीत असतांना, जे शत्रु म्हणूनच संमुख ठाकले आहेत त्यांच्याकडून आपल्या हितसंबंधांचें सुखैनैव रक्षण होईल अशी सुतराम् तरी अपेक्षा आपण कशी बरें बाळगतां? जें आपुलें आहे तें *मिळविण्यासाठींच केवळ सहस्रावधि हिंदु बंधूंनीं एकत्र येऊन* विचार, उच्चार नि तदनुसार आचार घडविण्याचें ठरविलें; तीं एक संघटना बनली, तर मग अशा या आपल्याच, आपल्याचसाठीं चाललेल्या कार्यांत आपण सहभागी कां होत नाहीं? आपलीं घरेंदारें, बायकापोरें सोडून, सारे संन्यासी बनून संघटनेच्या विशाल विस्तारांत समाविष्ट व्हा, असें कोण म्हणतो आपल्याला! आपण जें जिणें, माणुसकीला पारखें झालेलें शेणकिड्याचें लाजिरवाणें जिणें जगत आहांत, तेंच आपलें जीवन मानवतेला शोभून दिसेल असें खरें पौरुषयुक्त नि वैभवशाली व्हावें, हीच मनीषा या हिंदुराष्ट्रसंघटकांनीं आपल्या मनांत बाळगिली आहे.

—आणि असें कोणत्या भाग्याचें जिणें आपण जगतां आहांत सांप्रत? बायका-मुलांभोंवतीं गुरफटलेल्या संसारांत आपल्याला जर कांही प्रकाश दिसतच असेल, तर तो आपल्याच भावंडांच्या हिताची जी होळी पेटवून दिली गेली तिचा आहे, हें अद्यापि आपल्या कसें लक्षांत येत नाहीं! जे दुःखांतच पिचत आहेत त्यांच्याविषयीं तर कांहीं सांगावयालाच नको!

कारण असें पाहा कीं, मेलेल्या कोंबड्याला कधीं आगीची भीति वाटली आहे का? आपल्या हिंदु समाजाचें अधिक वाईट तें काय व्हावयाचें राहिलें आहे? आर्थिक, राजकीय, सामाजिक साऱ्या बाबतींत पिळला गेलेला हा समाज अशा आणीबाणीच्या परिस्थितींत गेल्या सहस्रावधि वर्षांत अनेकदां सांपडलेला आहे; आणि जगानें आश्चर्यानें तोंडांत बोटें घालावीं अशा पराक्रमानें तो त्यांतून विजयी

होऊन बाहेरहि पडलेला आहे ! आजची परिस्थिति कांहीं त्याहून वेगळी नाहीं. दुर्दम्य आत्मविश्वास नि प्रत्याघाताची इच्छा व शक्ति यांच्या जोरावर याहि अरिष्टांतून आपण पार पडूंच पडूं. आणि नुसते पार पडूं एवढेंच नव्हे तर पूर्वीं नव्हतों अशा कोणत्या तरी स्पृहणीय, आनंदमय, वैभवसंपन्न स्थितीला प्राप्त करून घेऊं. (१३-२-४२)

* * *

## आतां असें होईल ?

या हिंदु समाजावर आतांपर्यंत परकीयांकडून सतत आघात होत आले आहेत; आणि हा समाज ते आजवर निमूटपणें सोशीत आला आहे. ते जे आघात झाले त्यांत स्त्रियांवरील अत्याचारापासून धर्माच्या उच्छेदापर्यंत सारे आघात आले. पण तरीहि सर्वसामान्य हिंदूंनीं नुसती वर मान करून पाहाण्याचेंहि धाडस केलें नाहीं, मग प्रत्याघाताची तर गोष्टच सोडा ! आणि अर्थातच प्रत्याघात न झाल्यामुळें त्या आघातांची परंपरा तशीच अखंड चालू राहिली. यापुढेंहि जर प्रत्याघाताची इच्छा नि शक्ति आपल्यांत निर्माण झाली नाहीं तर ते आघात थांबणार नाहींत. एक दिवस आपला हा पुरातन समाज त्यांत कायमचा नष्ट होऊन जाईल. पण जर प्रत्याघाताची इच्छा नि शक्ति आपण आपल्यांत उत्पन्न केली, प्रचंड प्रमाणावर निर्माण केली, तर परिस्थितींतील 'भयंकर'पणा आपल्याला भेडसावणार नाहीं. "मरणहांक तों चुकेना । देह वांचवितां वांचेना । विवेक होऊनि समजाना । काय करावें ॥" (श्रीसमर्थ—क्षात्रधर्म १४)

'भयंकर परिस्थिति उत्पन्न झाली आहे. परचक्र घराच्या भिंतीवर येऊन आदळलें आहे. आतां आमचें कसें होईल ?' आज हिंदुस्थानांत कोठेंहि जा; याच प्रकारचे निराशामय, भयभीत अंतःकरणाचे उद्गार तुमच्या कानीं येतील. पण मला मोठें आश्चर्य वाटतें या माझ्या देशबांधवांचें ! आज परिस्थिति भयंकर उत्पन्न झाली आहे; मग यापूर्वीं गेलीं शंभर-सवाशें वर्षें काय अगदीं सुस्थितींत होतांत तुम्ही ?

आज परचक्र बरावर धक्के देऊं लागलें आहे; पण जें दुसरें एक चक्र तुमच्या प्रत्यक्ष घरांतच घुसून वसलें आहे तें काय परकें नव्हतें? आणि म्हणून 'आतां कसें होईल' हा प्रश्न भयभीत चित्तानें विचारण्याआधीं यापूर्वी तुमचें कसें होत आलें तें नीट लक्षपूर्वक विचारांत घेतलेंत तर 'आतां कसें होईल' याविषयीं मोठा गंभीर विचारविनिमय करीत बसण्याची आवश्यकता उरणार नाहीं. (१३-२-४२ वरून सुधारून)

* * * *

## अरे, तूं हिंदु आहेस !

किती विपरीत दुर्दशेप्रत अधोगति झाली आहे आमची ! आम्ही हिंदु आहोंत, रामकृष्णादि नि प्रताप-शिवाजी आदि नरश्रेष्ठ पूर्वजांचे वंशज आम्ही आहोंत हेंच विसरून गेलों. नि म्हणून ओरडून, आक्रोशून सांगावें लागतें कीं, तूं हिंदु; तूं या भारतवर्षाचा राष्ट्रीय घटक अशिक्षितांना कळत नाहीं म्हणून त्यांची नोंद अहिंदूंत. तर शिक्षणाच्या शिखरावर चढल्यानें स्वतःसच सारें कळतें अशा समजुतीनें नि विश्वबंधुत्वाच्या कल्पनेनें वेडावलेले 'हिंदु' म्हणवून घ्यावयास सिद्ध नाहींत, म्हणून तेहि अहिंदुच. मग राहिले कोण? ही स्थिति पालटली पाहिजे. हिंदुस्थानांतील प्रत्येक हिंदूची नोंद हिंदु म्हणूनच झाली पाहिजे. आणि त्यासाठीं आपले दैनंदिन व्यवहार संभाळूनहि आसपासच्या अज्ञानी लोकांना हें समजावून देणें प्रत्येक हिंदूला शक्य नाहीं का? हिंदुराष्ट्राचें भवितव्य आजच्या ३०-३५ कोटि हिंदूंनींच घडवावयाचें आहे हें विसरून चालणार नाहीं. कर्तव्याची जाणीव असलेल्या हिंदुमात्राला केवढें तरी कार्य करितां येईल; पण तळमळ हवी. मग कार्यसिद्धि हात जोडून उभीच आहे.

(२८-१-४१)

* * *

## संक्रमण

अशीं अनेक सहस्रकें लोटलीं कीं, ज्या काळीं हिंदुविजयाचा डंका

आपल्या गंभीर निनादानें दिगंत घुमवीत होता. हिंदु समाज एक तेजोनिधि सत्ताकेंद्र बनून राहिला होता. हा आमचा भूतकाल !

आज अशी स्थिति आहे कीं, हिमाचलापासून कन्याकुमारीपर्यंत आणि सिंधपासून वंगपर्यंत पसरलेल्या या आमच्या हिंदुस्थानांतहि हिंदूंचें जीवित, अब्रू वा वित्त सुरक्षित नाहीं; आमच्या देशांत ही स्थिति तर देशांबाहेरचें काय विचारावें ? ना तेज, ना सत्ता ! पारतंत्र्याच्या चिखलांत बरबटलेले मानहीन, कर्तृत्वहीन, धैर्यहीन, दुबळे किडे जणूं. मुसलमानांनीं मारावें नि पारश्यांनीं हंसावें; इंग्रजांनीं पिळावें नि जगानें तिरस्कारावें. हाय; हें आमचें वर्तमान ! नि भवितव्य ? भूमितलावर हिंदु हें नांवसुद्धां शिल्लक उरणार नाहीं. हा आर्यावर्त, हें समर्थांचें आनंदवनभुवन, ही रामकृष्णांची सुवर्णभूमि, इस्लामियांचें पाकिस्तान वा अन्य कोणा ख्रिस्त्यांचें ख्रिस्तस्तान बनून जाईल !

—हें भवितव्य उलथवावयाचें असेल तर एकच एक उपाय. अहिंसेच्या भीरु तत्त्वज्ञानांतून खड्गाच्या प्रभावी कर्मशास्त्रांत, विश्व-बंधुत्वाच्या फसव्या जाळयांतून राष्ट्रभक्तीच्या स्वतंत्र भूमींत, आणि विघटनेच्या निरनिराळ्या खुराडयांतून संघटनेच्या एकमेव गृहांत प्रत्येक हिंदुमात्रानें संक्रमण केलें पाहिजे. प्रखर हिंदुत्वनिष्ठेची ही एवढी अग्निरेषा ओलांडून आंत आलांत, कीं स्वतंत्रतादेवी तुमचें प्रेमळ स्वागत करावयास सिद्धच आहे ! (१०-१-४१)

* * *

## आतांच —पुढें केव्हांहि नाहीं !

तरुण हिंदुस्थाना ! एकदां डोळे उघडून पाहा तरी काय चाललें आहे तुझ्या आसपास. नीट कान देऊन ऐक तरी कसल्या गर्जना उठत आहेत तुझ्या आसमंतात्. तो हिटलर तिकडे आपल्या अप्रतिहत वेगानें राज्येंच्या राज्यें उलथवीत नि नगरेंच्या नगरें धुळीला मिळवीत प्रलयकालासारखा धांवत सुटला आहे. तो अमेरिका साऱ्या जगाचेंच शस्त्रागार बनण्याच्या ईर्षेनें युद्धसाहित्याचें अनंत उत्पादन करीत

आहे. इकडे हा जपान अफाट महत्त्वाकांक्षेनें क्षणोक्षणीं प्रबल होत आहे. साऱ्या जगतीतलावर मानवजातीचा संपूर्ण नायनाट करण्यासाठींच जणूं महाभयंकर युद्धाचा वणवा पेटविला गेला आहे. त्याच्या ज्वाला, हिंदूंच्या हिंदुस्थाना, तुलाहि आतां चटके देऊं लागल्या आहेत. कर्णकर्कश रणगीतांच्या निनादांत तुझ्या स्वातंत्र्याच्या याचनेचे केविलवाणे स्वर कोणाच्या कानीं पडणार? उन्मत्त प्रबलांच्या या धकाधकोच्या मामल्यांत तूं स्वातंत्र्यासाठीं पसरलेल्या झोळींत त्यांच्यापैकीं कोणी एकादा तुकडा भिरकावील अशी वेडी आशा अजूनहि तुझ्या मनांत ठाण मांडून बसलीच आहे का?

आतां ही एकच अखेरचीच संधि! आत्तांच—नाहीं तर पुढें केव्हांहि नाहीं!! हिंदूचा हिंदुस्थान या मानानें जगावयाचें, टिकावयाचें नि स्वतंत्रतेंत उन्नत व्हावयाचें असेल तर एकच एक मार्ग —तुझे इतस्ततः उधळलेले, विघटित झालेले सारे घटक एकत्र करून येणाऱ्या संकटांशीं दोन हात करण्यासाठीं ताठर निश्चयानें उभा राहा. आंतून नि बाहेरून पेटलेल्या या आक्रमणांच्या खाईंत जळून भस्मसात् न व्हावें याकरितां फक्त एकच उपाय तुझ्यापाशीं शिल्लक आहे.

—हिंदुत्वाच्या एकमेव भूमिकेवर, त्याच्या एकमेव ध्वजाखालीं संघटित हो. सात-आठ कोटि मुसलमान जर पाकिस्तानसारखीं दुष्ट 'स्वप्नें' प्रत्यक्षांत उतरविण्याची ईर्षा बाळगतात तर आम्हीं तीस कोटि हिंदूंनीं निदान आमच्या मातृभूमीचे तुकडे पडूं नयेत, ती स्वतंत्रतेंत नांदावी, तिला वैभवाचे दिवस दिसावे अशा सात्त्विक आकांक्षा खऱ्या करूंच करूं असा आत्मविश्वास कां बाळगूं नये? दुसऱ्या कोणाचें वळकावण्यासाठीं नव्हे, तर आमचें स्वतःचें प्राणप्रिय हिंदुराष्ट्र शत्रूंच्या कारवायाना बळी पडूं नये, आमचा समाज, संस्कृति, धर्म नामशेष होऊन जाऊं नये या पवित्र हेतूसाठीं तरी एका संघटनेंत समाविष्ट होणें हें साऱ्या हिंदूंचें आद्य कर्तव्य आहे! मग, अशा संघटित नि बलान्वित हिंदुस्थानावर पारतंत्र्य लादण्याची

वा त्याची लचकेतोड करण्याची आशा यक्षनगरींत वावरणाऱ्यांनींच फक्त धरावी ! ! (२३–५–४१)

* * *

## काल्पनिक बंधनें झुगारून द्या !

खरें कार्य करणाराला कोणतेंच बंधन अडवूं शकत नाहीं. जो तो बहुशः काल्पनिक बंधांनींच स्वतःला जखडून घेऊन 'मी परिस्थितीनें बद्ध आहें' असें केविलवाणेपणानें विव्हळत असतो. हिंदुस्थानाच्या हितविरोधाची भीषण परिस्थिति इतकी तीव्रतर होत असलेली दिसत आहे कीं, या क्षणीं निदान कांहीं जणांनीं तरी व्यावहारिक बंध शक्य तों शिथिल करून घेऊन राष्ट्रीय संघटनेच्याच एकमेव कार्यासाठीं आयुष्य वेंचणें आवश्यक आहे. 'परिस्थिति सुधारूं दे,' 'जरा माझें व्यक्तिमत्व थोडें वाढूं दे' असें रडगाणें गात या संसारचक्रांतून बाहेर पडून कोणी समाजाचें वा राष्ट्राचें महत्तम कल्याण घडविलें असें देखिलें ना ऐकिलें ! तरुण हो, 'आयुष्याचा नाश होईल' अशी भीति तुम्हांला— हितबुद्धीनें— कित्येकांकडून घातली जाते; परंतु व्यक्तिनाशाची किंमत राष्ट्रनाशाहून अधिक मानण्यास तुमचें मन सिद्ध आहे काय ? हें कदाचित् खरें असेल कीं, 'माझ्या एकट्या'च्याच कार्यावांचून अखिल भारताचें स्वातंत्र्य अडून राहिलेलें नाहीं. तथापि 'थेंबांनींच तळें सांचतें' हा ऐतिहासिक सत्य सिद्धान्त दृष्टिआड करून चालणार नाहीं !

आणि जसें एकएका थेंबानें तळें सांचतें, तसेंच अनेक तळीं मिळून एक प्रवाह बनतो. अशा असंख्य प्रवाहांचा एक प्रचंड महासागर होतो. पण त्या एकएका थेंबानें तयार झालेल्या महासागरांत सारें जग बुडवून टाकण्याची प्रचंड शक्ति असली तरी ती एकएका स्वतंत्र थेंबांत मात्र नसते हें कोणीं कधींच विसरूं नये.

(६–६–४१)

* * *

## 'स्थान आमुचें अम्हीच राजे'

अजूनहि 'संदेशा'साठीं ज्यांचे विचार स्थगित होऊन राहिले असतील; कोठूनतरी 'स्फूर्ति' मिळेल याकरितां ज्यांचे हात निष्क्रिय बनले असतील; आणि कोणीतरी 'सांगेल' व मग आपण कामाला लागूं; असें ज्यांना वाटत असेल त्यांच्या हातून या जगांत कसलेंहि कार्य न घडतां ते जन्माला आले तसेच एक दिवस सहज मरून जातील. दैनंदिन व्यवहारांत 'हिंदु' म्हणून तुम्हांवर आघात केले जात असतां; दुःख नि अपमान यांच्याच रौरवांत पिचत असतां; तुमच्या संकटकाळीं तुमच्या साहाय्यार्थ कोणीहि परका धांवून येत नाहीं, याचा शेंकडों वेळां अनुभव आला असतांसुद्धां; 'मला कोणी शिकवील का,' 'माझ्या संरक्षणार्थ कोणी पुढें होईल का हो,' अशी केविलवाणी रड तुम्हीं कां बरें चालविली आहे? स्वतःच्या घराला आग लागली हें दिसत असतां कोणीतरी परक्यानें येऊन ती विझ-विण्याचा तुम्हांला 'संदेश' वा 'स्फूर्ति' द्यावी असें तुम्हांला वाटतें काय? तुम्ही स्वस्थ बसून राहिले असतांना परक्यांनीं येऊन तुमच्या घराची आग विझविण्याचा 'परोपकार' करावा अशी तरी तुमची अपेक्षा आहे काय?

हें घर तुमचें आहे, हें हिंदुस्थान हिंदूंचें आहे व या समाजाच्या रक्षणवर्धनाचें दायित्व त्यांतील प्रत्येक लहान-मोठ्या घटकावर कर्तव्य म्हणून पडलेलें आहे. स्वार्थत्याग, देशभक्ति, राष्ट्रकार्य असलीं मोठ-मोठालीं नांवें त्या कर्तव्याला देण्याची कांहीं आवश्यकता नाहीं. 'मी हें काम करतों' असें म्हणून कर्तव्यबुद्धीनें आपण स्वतः पुढें झालें पाहिजे. वटवट, तोंड असलेल्या कोणाहि माणसाला करतां येते; मग प्रत्येक हात असलेल्या मनुष्याला कार्यहि कां करतां येऊं नये? हिंदु समाज हा स्वतःच्या स्वातंत्र्याचा, उत्कर्षाचा स्वतः धनी आहे; त्याला कोणीं स्वातंत्र्याची भीक घालावयाला नको आहे; तशी ती कोणी घालणार नाहीं आणि घातली तरी ती सांभाळतांहि येणार नाहीं.

मनगटांत सामर्थ्य नि हृदयांत आत्मविश्वास दृढ असेल, तर खरोखरी आम्हीच आमचे राजे आहोंत; आमच्या स्वराज्याआड येण्याइतकी कोणतीहि शक्ति दुर्जय नाहीं. आम्ही हिंदु, शब्दाचे अर्थ विसरलों आणि शब्दच्छलांतच कालाचा नि शक्तीचा अपव्यय करून मागून त्याबद्दलहि कारणमीमांसा लावण्याकरितां पुनः शब्दांचाच कीस काढीत वादविवाद घालीत राहिलों. आम्ही आम्हांलाच विसरलों आहोंत. आपण जिवंत राहूं शकतों, एवढासुद्धां विश्वास जर आपल्याला वाटत नसेल तर वैभवशाली हिंदुराष्ट्राच्या गोष्टी कशाला ?

इतकें असलें तरी जागतिक परिस्थितीच अशी घडत आहे कीं, जीं जीं हिंदु अंतःकरणें जिवंत आहेत, निदान ज्यांच्यांत अद्यापि धुगधुगी तरी शिल्लक आहे, त्यांच्या कानांत हीच मंत्रौषधि ती परिस्थिति ओतीत आहे, कीं —

"हिंदु स्वतःचा स्वतःच स्वामी । लाथाडिल हें जिर्णें गुलामी
वैभवशाली हिंदुराष्ट्र जधिं । चमकत राही अखंड तेजें ॥
वर्षप्रतिपदा तरीच साजे । स्थान आमुचें अम्हीच राजे ॥"

(१७–३–४२)

* * *

## हिंदुमात्रानें स्वतः खपावयाचें ठरविलें तर—

'हिंदु जातीच्या उद्धारासाठीं परमेश्वर आतां अवतार घेईल का ?' आम्ही वाट पाहात आहोंत. 'हिंदु संस्कृतीच्या रक्षणासाठीं कोणी ईश्वराचा प्रेषित खालीं येईल का ?' आम्ही आशेनें बघत आहोंत. चिंतातुर जीवांनो, सोडून द्या ती वेडी आशा ! या संघशक्तिप्रधान कलियुगांत असा कोणी एक प्रेषित, एक ईशावतार येऊन तुमचें कल्याण करील असें समजू नका. तुमच्यांतलेंच परमेश्वरी तेज प्रकट होऊं द्या. अशा व्यक्तिव्यक्तींच्या अनेक तेजःकणांतून एक प्रभावी तेजःपुंज राष्ट्रशक्ति निर्माण होईल; तिचें नांव संघटना ! राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक साऱ्या साऱ्या कुलुपबंदीवर ही एकच किल्ली. साऱ्या

निरगांठी (dead-lock) सोडविण्याचें हें एकमेव अमोघ साधन. 'गार्डियन नॉट' तोडणारें शिकंदरचें तेजस्वी खड्ग म्हणजे अशी संघटना ! मात्र अवताराची वाट पाहात बसलों तर शेवटपर्यंत वाटच पाहात बसावें लागेल. त्या वाटेनें तारक विभूति न येतां मारक आपत्ति येतील; आपल्या सर्वस्वाचा विध्वंस करून टाकतील. प्रेषिताच्या आगमनाकडे डोळे लावून बसलों तर प्रेषिताऐवजीं संहारकाचें दर्शन घडेल; तो आपलें उरलेंसुरलें राष्ट्रीयत्वहि उध्वस्त करून टाकील.

हें लक्षांत ठेवावयाला हवें आहे कीं, १७ व्या शतकांत हिंदु साम्राज्याचा जो एवढा भव्य प्रासाद उभारला गेला त्याच्या पायांत एका शिवाजीबरोबर सहस्रावधि हिंदूंचें रक्त सांडलेलें होतें. हेंहि विसरून चालणार नाहीं कीं, जगांतील कोणतेंहि महत्कृत्य घडविण्यासाठीं कोणातरी ज्ञातअज्ञात व्यक्तींचा वा व्यक्तिसमूहांचा असीम त्याग, त्यांचे जीवापाड श्रम कारणीभूत झालेले असतात. अशा व्यक्तींपैकीं आपण एक बनण्याचा प्रयत्न करणें हें आपल्यांपैकीं प्रत्येकाच्या हातचें आहे. आपण होऊन पुढें यायला पाहिजे आहे. अवताराच्या हांकेची वाट पाहाणें वेडेपणाचें ठरेल. आणि परमेश्वर तरी त्यांच्याच पाठीशीं उभा असतो कीं जे स्वतः पुढें जातात, परिश्रम घेतात. "कष्टेंवीण फळ नाहीं । कष्टेंवीण राज्य नाहीं । केल्यावीण होत नाहीं । कार्य कांहीं ॥" हे प्रत्यक्ष ईशस्वरूप असलेल्या राष्ट्रगुरु समर्थांचे उद्‌गार सदैव मनांत बाळगून आपण आज, या क्षणापासून, स्वतः खपायचें ठरविलें तर;—या दरिद्री हिंदुस्थानांत, परतंत्र हिंदुस्थानांत, हीनदीन हिंदुस्थानांत, हिंदु जातीची, हिंदु संस्कृतीची विजयध्वजा स्वतंत्रतेच्या समीरणांत उंच फडकत जगाला सांगेल, 'जगाला हव्या असलेल्या चिरशान्तीचा, कल्याणाचा, मार्ग हा इथें आहे !'

(२७–६ ४१)

* * *

## जसे भक्त तसा त्यांचा देव

'ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्' हा न्याय आहे. धैर्य-

वानाचा देव धैर्यवान् असतो. पातक्यांचा देव पातकी असतो. नरमांस भक्षण करणाऱ्या भक्तांच्या देवतेला नरमांसाचाच नैवेद्य लागतो; नररक्ताचा टिळा तिच्या भाळीं शोभतो. शूर, वीर शीखांचा देव लाहोर-अमृतसरसारख्या मुसलमान बहुसंख्याक नगरांतसुद्धां मोठ्या मानानें पवित्र राहूं शकतो. कोणा अहिंदूची छाती होत नाहीं त्या देवाकडे वांकडी दृष्टि करून पाहण्याची ! याचें. कारण शीखांचा भाव दृढ आहे. आणि ते स्वत: जिवंत अंत:करणाचे, तेवत्या स्वाभिमानाचे आहेत म्हणून त्यांचा पाठीराखा ईश्वरहि जिवंत, जागृत आहे.

ज्या निवृत्तिनाथांचा अभिमान महाराष्ट्रीय हिंदु बाळगतात त्या निवृत्तींची पालखी त्यांच्या वैध धार्मिक अधिकाराप्रमाणें नेण्याला उघडपणें प्रतिबंध होऊं शकतो. पालखी रस्त्यावर अडून राहाते. आणि आम्ही तें शान्त मनानें 'पोक्त' विचार करून 'सहन करतों ! सोलापूरच्या शुभराय मठांतील रथाची मिरवणूक दरवर्षाप्रमाणें निघावयाची ती जातीय दंग्याच्या भीतीनें आम्ही रद्द करतों ! मूठभर अत्याचारी गुंडांच्या, अधर्मीयांच्या भयानें आम्ही 'सहिष्णु' हिंदु आमच्या वैध अधिकारांवर पाणी सोडावयास खुशाल सिद्ध होतों. आणि त्या वृत्तीचें 'शान्तिप्रिय' म्हणून समर्थन करून, परमेश्वरानें आमच्या या नादानपणास साहाय्य करावें अशी त्या दयाघनाकडून अपेक्षा करतों ! ! नाहीं. दुबळ्यासाठीं तो सर्वशक्तिमान् परमेश्वर कधींच धांवून येणार नाहीं. डळमळीत भाव असणाऱ्या भक्तांकरितां त्याचें दुष्टसंहारक सुदर्शन कधींच वर उचललें जाणार नाहीं. यावरून असेंच दिसत नाहीं का, कीं परमेश्वराचें अधिष्ठान शक्ति हेंच आहे?

(११–७–४१)

* * *

## हिंदु संस्कृतीच्या जीवनमरणाचा प्रश्न

'मुसलमान' म्हटलें कीं बाऊ कसला वाटतो तुम्हांला एवढा? तींहि माणसेंच आहेत ना; तुमच्यासारखे दोन हात नि एकच डोकें

आहे ना त्यांनाहि ! मग ज्या हिंदूंनीं बलाढ्य मोगली सिंहासन हां हां म्हणतां धुळीला मिळविलें त्या शिवप्रतापांच्या शूर वंशजांना हें पाकिस्तानचें भूत गाडावयाला एवढी कसली भीति वाटावी ? तुम्हांला माहीत आहे ना कीं निर्जीव बंदुका किंवा त्या पेलणारे दणकट हातं हे लढत नसतात; त्यांच्या मागचीं निर्भय नि बलाढ्य अंतःकरणेंच खरी झुंज करून विजय संपादीत असतात. आजवर खाल्ला असेल मार, दिले असतील किती तरी हिंदु बळी, जगलों असूं लाजिरवाण्या अवमानित स्थितींत; पण यापुढें तर जागे होतां येईल ना ? सुसंघटित बनून तद्वारा बल संपादून आपल्या मायभूचे तुकडे करूं इच्छिणाऱ्या शत्रूंचीं कारस्थानें धुळीला मिळवितां येणें आजहि अशक्य नाहीं ना ?

तुम्ही उत्साह धरा, भीतीला हृदयांतून हांकलून लावा नि शूरासारखे दंड थोपटून समरार्थ सरसावा; मग पाहूं कोणतीं रानवट तोंडें आमच्या प्रिय भारताचें 'पाकिस्तान' बनविण्याची उद्धट भाषा उच्चारतात तीं ! कारण हा अवघ्या हिंदु संस्कृतीच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. आणि समीपच्या भविष्यकालांत इस्लामच्या वरवंट्याखालीं भरडून निघण्याचीं चिन्हें आज स्पष्ट दिसत असतां स्वस्थ बसणें उचित ठरेल काय ? कधींच नाहीं. यास्तव हिंदुत्वाच्या एकमेव भूमिकेवर येऊन आपण सारे हिंदु सिंहगर्जना करूं या : 'आमचा हिंदुस्थान सर्वदा, सर्वकाळीं आम्ही अखंड नि अविभाज्यच ठेवूं.'

पण लक्षांत ठेवा बरें, उद्यांचा काळ शास्त्रांचा नि वचनांचा नसून शस्त्रांचा नि कृतीचा आहे ! (१८–४–४१)

* * *

## तसें घडावयास नको असेल तर—

आपल्याच संस्कृतीच्या, धर्माच्या, रक्ताच्या, नि हाडामांसाच्या माणसांशीं वैर धरून, तीं माणसें आपल्याच समाजाला चांगले दिवस दिसावे यासाठीं खरोखरीच रक्ताचें पाणी करीत असतां, त्यांच्या जीवावर उठावें अशी वृत्ति इतरत्र कोठें दिसते का ? मीं एक असें

उद्वेगजनक दृश्य नुकतेंच पाहिलें. ज्या हिंदु समाजाच्या कल्याणासाठीं ज्या एका राष्ट्रीय चळवळींतील लहानथोर घटक नि:स्वार्थी हेतूनें रात्रंदिवस कष्टत असतात त्याच चळवळींतील घटकांचे 'मुडदे पाडण्या'च्या उद्देशानें त्या हिंदु समाजांतीलच 'लढाऊ' समजल्या जाणाऱ्या वर्गांतील एक मोठा जमाव धांवून येतो, हें दृश्य कोणा राष्ट्रीय वृत्तीच्या अंत:करणाला उद्वेग आणल्याविना राहील !

अजून आमच्या हिंदु समाजाचे डोळे उघडले नाहींत काय ? जयचंद राठोडानें नि सूर्याजी पिसाळानें आमच्या राष्ट्राचा घात केला. अनेक रजपुतांच्या प्रतापी पराक्रमानेंच दिल्लीच्या जुलमी मोगली सिंहासनाला बळकटी आणली. आणि कांहीं मराठे सरदारांच्याच आत्मघातकी वैरवृत्तीनें इंग्रजी राज्यकर्त्यांचें आसन येथें स्थिर केलें. हा सारा इतिहास अजूनहि आम्हांला कांहीं शिकवूं शकत नाहीं काय ? स्पृश्यास्पृश्य, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, एवढेंच नव्हे तर देशस्थ-कोंकणस्थ नि ऋग्वेदी-यजुर्वेदी यांच्यांतहि कलह माजविल्यामुळें आमच्या राष्ट्राचें वाटोळें झालें हें अद्यापिहि आम्ही उमगूं शकत नाहीं ? आमची बुद्धि, शक्ति परस्परांत भांडण्यासाठींच खर्च होत असून त्यामुळें पारतंत्र्याचा पाश आमच्या मानेभोंवतीं अधिकाधिक करकचला जात आहे याची जाणीव दशकावधि वर्षांच्या अनुभवानंतरहि आमच्या मनाला शिवली नाहीं का ? आणि इतक्या उपरहि जर शहाणपणा शिकावयास आम्ही सिद्ध नसूं तर मग 'तुम्ही स्वराज्य चालविण्यास नालायक आहांत' असें कोणीं म्हटल्यास त्यांत वावगें तें काय ? ही घातकी वृत्ति आपण जोंवर सोडली नाहीं; नि 'हिंदु तेवढा एक' या विशुद्ध भूमिकेवर जोंवर आपण उभे राहात नाहीं तोंवर, माझ्या प्रिय हिंदुस्थाना, तुला मानहीन नि सत्त्वहीन बनून जगाच्या बाजारांत कवडीमोलानेंच पडून राहावें लागेल ! (११-४-४१)

* * *

## वाचाळ आक्षेपकांसाठीं–

कोणा हिंदूवर अत्याचार घडला कीं हिंदु समाजांतीलच कांहीं जण विचारतात 'तात्याराव सावरकरांचें लक्ष इकडे जात नाहीं काय ? ते या असहाय हिंदूंच्या साहाय्याला कां धांवून गेले नाहींत ?' पण उलट मी प्रश्न करतों—'काय अधिकार तुम्हांला हा प्रश्न विचारण्याचा ? उभ्या जन्मांत कधीं कोणा आर्त हिंदूला हात देण्यासाठीं धांवून गेला आहांत का तुम्ही ? तुम्हांला होणाऱ्या मासिक प्राप्तींतून एक कपर्दिक तरी केव्हां हिंदूंच्या बऱ्याकरितां खर्च केल्याचें, स्वेच्छेनें खर्चिल्याचें आठवतें का तुम्हांला ? दररोजचें चमचमीत भोजन झोडतांना कधीं हिंदूंवरील आपत्तींच्या स्मरणानें त्यांतील घांस घशाशीं घोटाळला आहे का तुमच्या ? नि रंग-मौजेंत पैसे उडवितांना आर्त हिंदु अबलांच्या करुण किंकाळ्यांनीं दचकून हात आखडला, थांबला असें कधीं घडलें आहे का तुमच्या बाबतींत ?' या साऱ्या प्रश्नांना नकारात्मक उत्तर देणारेच महाभाग मोठा आपुलकीचा आव आणून विचारीत असतात कीं, 'सिंधमधल्या असहाय हिंदूंसाठीं हिंदुमहासभेनें काय केलें ?' तेच निष्क्रिय बडबडे कुत्सितपणें म्हणूं शकतात कीं, 'सावरकर झोपीं गेले आहेत !' हेच वाचाळ आक्षेपक मोठ्या ऐटीनें पृच्छा करितात कीं–'सरसीमेवर होणाऱ्या अत्याचारांना आळा घालण्यासाठीं राष्ट्रीय स्वयंसेवक संघ काय करतो ?' या असल्या वाचाळ आक्षेपकांना एकच उत्तर आहे कीं, तुम्हांसारख्या 'परोपदेशपंडितां'शीं वादविवाद करण्याइतकी सवड नि आवश्यकता महासभा, सावरकर किंवा संघ यांपैकीं कोणालाच नाहीं. (१७-१-४१)

**संघटकांशीं दोन शब्द** : : : : २

## 'हिंदु तितुका मेळवावा'

[ज्या संजीवनीनें सतराव्या शतकांत मृतप्राय झालेला हिंदु समाज

निदान महाराष्ट्रांत तरी जागा करून वैभवाच्या शिखरावर चढविला त्या संजीवनीचें नांव 'महाराष्ट्र धर्म.' जुनें म्हणून निरुपयोगी, ही वृत्ति घातकी आहे; उलट इतिहासाच्या अनुभवानें शहाणे होण्यांतच माणुसकी असून जुन्या मात्रेप्रमाणें, वाढत्या जुनेपणाप्रमाणें, वाढत्या क्रमानें गुण देणाऱ्या संजीवनी मात्रेचे वळसे महाराष्ट्रांतीलच काय पण अखिल भारतवर्षांतील रोगजर्जर हिंदु समाजाला निरोगी नि सामर्थ्य-संपन्न बनवितील असा विश्वास वाटतो. मात्र या 'महाराष्ट्र धर्मा'चें स्वरूप आतां महाराष्ट्राच्या भौगोलिक मर्यादा ओलांडून सर्वव्यापी झालेलें आहे हें प्रत्येकानें ध्यानांत ठेवणें अवश्य आहे. या महाराष्ट्र-धर्माचे संस्थापक श्रीसमर्थ रामदास हिंदुमात्राच्या चांगले परिचयाचे आहेत. विशेषतः संघटक तरुणांनीं या विचारधारांचें प्राशन केल्यास गुण तात्काळ दिसावा अशी अपेक्षा. यास्तव प्रस्तुत विचार तरुण हिंदुसंघटकांना उद्देशूनच मुख्यतः प्रकट केले जात आहेत.]

"मराठा तितुका मेळवावा । आपुला महाराष्ट्रधर्म वाढवावा ।।
येविषयीं न करितां तकवा । पूर्वज हांसती ।।" (क्षात्रधर्म १३)

आतां हें साऱ्यांना चांगलें माहीत झालें आहे कीं, हिंदुसंघटकांची दृष्टि 'मराठा' या विशिष्ट समाजापुरती मर्यादित राहिली नसून 'हिंदु तेवढा एक' या व्यापक वृत्तीनें ते कार्य चालवीत आहेत. अशा हिंदु समाजांतील प्रत्येक हिंदु मिळविण्यासाठीं आपण हिंदुसंघटकांनीं मधमाशीप्रमाणें अखंड, अविरत नि कौशल्यानें खपत राहिलें पाहिजे. प्रत्येक हिंदु हा भविष्यकालीन विराट् हिंदुराष्ट्राचा एक घटक आहे. भावी हिंदुराष्ट्राच्या शासनयंत्रांतील त्याचें स्थान अटळ आहे; आणि म्हणून आज अस्तित्वांत असलेल्या या तीस कोटि हिंदु समाजांतील प्रत्येक लहानमोठा पुरुष नि स्त्री यांना 'मिळविण्या'साठीं म्हणजेच त्यांना एकत्र करून त्यांची संघटना घडविण्यासाठीं आपला प्रत्येक क्षण खर्चीं पडला पाहिजे. त्या संघटनाशास्त्राचे कठिण धडे स्वतःच्या हातांनींच प्रत्येकाला गिरवावे लागतात. त्याचा विचार क्रमशः करूंच.

परंतु हिंदु तेवढा मिळविण्यासाठीं करावयाचे प्रयत्न पूर्णत: शास्त्रशुद्ध नसल्यास त्यांत यशप्राप्तीची आशा फार थोडी राहील एवढें मात्र लक्षांत ठेविलें पाहिजे. हिंदुमात्र एकत्र मिळवावयाचा तो कशासाठीं याचें उत्तर खडे मांडून शिकविण्याचा काळ आतां राहिलेला नाहीं. ज्याला जगावयाचें असेल त्यानें विघटित राहून भागत नाहीं, या सिद्धान्ताचा आजकाल सारेंच जग कटु अनुभव घेत आहे.

या मिळवावयाच्या हिंदूंत कोण कोण येतात यापेक्षां कोण येत नाहींत असाच प्रश्न विचारणें योग्य ठरेल. कारण जे देशद्रोही आहेत, जे आपल्या धर्म, समाज, संस्कृति यांच्या हितावर अट्टा-हासानें जळता निखारा ठेवण्यास उद्युक्त झाले आहेत, अशा अराष्ट्री-यांनाच फक्त या राष्ट्रीय संघटनेंतून वगळलें जाईल. त्याशिवाय बाकीचे सर्व स्त्री-पुरुष, आबाल-वृद्ध, गरीब-श्रीमंत, धनी-सेवक, राजे-भिकारी, विद्वान्-अशिक्षित, फार काय जीवन्मुक्त नि दरवडखोरसुद्धां या संघटतेंत बसूं शकतात; कारण राष्ट्रीय संघटना हेंच मुळीं काय तें राष्ट्र आहे : त्यांतील दगड-धोंडे वा द्रव्य-संपत्ति नव्हे. आमच्या राष्ट्रांतील क्षुद्रांतील क्षुद्र राष्ट्रीय घटक हा परकीयांच्या वा परराष्ट्रांच्या मोठ्यांत मोठ्या थोर पुरुषापेक्षां आम्हांला अधिक जवळचा, अधिक रक्षणीय, अधिक महत्त्वाचा वाटावा.

पण अजून असें घडत नाहीं. 'हिंदु तेवढा मेळवावा' या शिक-वणीला जन्म देणारी वृत्तीच या दुर्दैवी समाजांतून आतांपर्यंत नष्ट-प्राय झालेली होती. पण आतां— (२३-१-४२)

* * *

## जंवरी चंदन झिजेना—

"जंवरी चंदन झिजेना । तंव तो सुगंध कळेना ॥
चंदन आणि वृक्ष नाना ॥ सगट होती ॥" (दास. १७.२ १२)

'हिंदु तितुका मेळविणें' म्हणजे राष्ट्रीय संघटना निर्माण करणें; हें कांहीं दिसतें तितकें सोपें कार्य नाहीं. 'हें राष्ट्र हिंदूंचें आहे' अशी

६७७४

धीरगंभीर गर्जना ज्या महान् द्रष्ट्यानें प्रथमतः केली त्या पुरुषाला किती दारुण आपत्तींशीं झुंजावें लागलें तो इतिहास पाहिला तर वरील विधानाची सत्यता पटेल. कारण 'हिंदुत्व म्हणजेच राष्ट्रीयत्व' हें समीकरण या रसातळाला गेलेल्या भारतीय समाजाच्या मेंदूपर्यंत पोहोंचविण्यासाठीं अनेक लहानमोठ्या देशभक्तांना आपल्या सर्वस्वाचें बलिदान आतांपर्यंत करावें लागलें आहे. आणि तरीहि तें समीकरण या वेळपर्यंत फक्त कांहींच्या मेंदूपर्यंतच जाऊन पोहोंचलें आहे; अंतः-करणाशीं नेऊन भिडविण्यासाठीं उचलले यापेक्षां अनंत पटींनीं कष्ट उठवावे लागणार आहेत. आणि ते कष्ट म्हणजे ज्याला 'गाढवी' कष्ट म्हणतात तसलेहि चालणार नाहींत किंवा तें अंगचुकारपणानें केलेल्या कामाचें नुसतें दिखाऊ प्रदर्शनहि असून भागणार नाहीं. ते श्रम नि तें कार्य संघटनाशास्त्राच्या साच्यांत बसविलेलें आणि अनुभवसिद्ध आडाख्यांना अनुसरूनच करावयास पाहिजे. संघटना म्हणजे काय तें नुसतें पुस्तकांत वाचून किंवा केवळ व्याख्यानें ऐकून कळणार नाहीं. त्यासाठीं स्वतः प्रत्यक्ष अनुभवच घेतला पाहिजे. रणांगणावर प्रतिस्पर्ध्याशीं दोन हात केल्याशिवाय कोणीहि खराखुरा सैनिक बनूं शकत नाहीं, तद्वतच प्रत्यक्ष संघटनेच्या यंत्रांतील एक खिळा किंवा आवश्यकतेनुरूप योग्य तो भाग बनून त्या यंत्राचें कार्य स्वतः चाल-विल्याशिवाय संघटक या संज्ञेला कोणीहि पात्र होऊं शकत नाहीं. आणि जी गोष्ट स्वतःबद्दल तीच इतरांबद्दलहि खरी आहे. आपल्या गुणांचा नि कर्तबगारीचा कस लावण्यासाठीं आपण प्रत्येकानें जसें कार्याच्या विशिष्ट पद्धतींतून जाणें आवश्यक आहे तसेंच आपल्या सभोंवारचीं माणसेंहि त्या संघटनेंतून तावूनसुलाखून बाहेर पडणें आवश्यक आहे. कारण "जंवरी चंदन झिजेना । तंव तो सुगंध कळेना ॥ चंदन आणि वृक्ष नाना । सगट होती ॥" या समर्थोक्ति-प्रमाणें अनंत माणसें या संघटनेंत झिजावयास लावून म्हणजे प्रत्यक्ष कार्यास लावून त्यांतील खरे चंदन राष्ट्रकारणीं उपयोजिले जावेत.

असे अनेक चंदनवृक्ष आपल्या या तेजस्वी भूतकाल असलेल्या भरत-खंडांत आजहि निवसत असतील; फक्त त्यांना झिजावयाचें कसें तें माहीत नाहीं. म्हणूनच त्यांची गणना सरसकट झाडांत केली जात असते. राष्ट्रीय संघटनेच्या मुशींत त्यांचा जीवनरस एकदां ओता म्हणजे दोन्ही अर्थांनीं सुवर्णहीन झालेल्या या देशांत केवढा मोठा बावनकशी विशुद्ध सुवर्णाचा सांठा अस्तित्वांत आहे तें आपल्या प्रत्ययाला येईल. सुप्त राष्ट्रपुरुषाच्या जागृतीला याविना अन्य साधन यापुढें शिल्लक उरलेलें नाहीं. उपाय एकच– संघटनेची "क्रिया करूनि करवावी। बहुतांकरवीं ॥" (२४-२-४२)

* * *

## हिंदु समाजांतील बद्ध

चराचर सृष्टींत जे अपार जीव दाटले आहेत त्यांची बद्ध, मुमुक्षु, साधक व सिद्ध अशी चार प्रकारांत श्रीसमर्थांनीं वर्गवारी केली आहे. राष्ट्राच्या सृष्टींतील मानवी जीवांचेंहि असेंच वर्गीकरण करून दाखवितां येईल.

"आतां बद्ध तो जाणिजे ऐसा। अंधारींचा अंध जैसा।
चक्षुविण दाही दिशा। सुन्याकार ॥" (दास. ५.७.६)

असें बद्धाचें वर्णन श्रीसमर्थांनीं केलें आहे. "न कळे आपणासि आपण। या नांव बद्ध" असेंहि त्यांनीं पुढें सांगितलें आहे; 'तूं माणूस आहेस. माणसाला भावना असतात; आणि तूं हिंदु असल्यामुळें तुझ्या भावना हिंदुराष्ट्राला पोषक अशा असल्या पाहिजेत' असें ज्या माणसांना सांगावें लागतें तीं माणसें राष्ट्रीय दृष्ट्या बद्धच म्हणतां येतील. ज्यांना स्वत:च्या हिंदुत्वाची जाणीव झाली आहे अशांनीं आपल्या या समाजा-कडे एकदां दृष्टिक्षेप करावा; म्हणजे त्यांना असें दिसून येईल कीं, आज बहुसंख्य समाज बद्ध स्थितींतच राहिलेला आहे. या बद्धांचें समाजांतील प्रमाण एवढें मोठें आहे कीं, ज्यांची आज ती अवस्था संपली आहे अशा मुमुक्षु-साधक-सिद्ध स्थितींत गेलेल्यांचें अस्तित्व

शोधूनच पाहावें लागतें. या बद्धांना हिंदुस्थान हा आपला देश आहे नि त्यांत निवसणारा आपल्याच रक्ताचा हिंदु समाज हा आपला समाज आहे याची जाणीवच नसते. म्हणून तशा बद्धांकडे कोणी विचारावयास गेला कीं, 'का हो, तुमच्या या स्वदेशासाठीं नि स्वसमाजासाठीं तुम्ही कांहीं काम करीत असतां काय'? तर ते उत्तर देतात— 'स्वदेश? कोणता बुवा हा देश? या स्वदेश नि स्वसमाज वगैरेंशीं आम्हांला कांहीं करावयाचें नाहीं. आम्हांला आमचा संसार बरा कीं आम्ही बरे. त्या नसत्या भानगडींत पडावयाला आम्हांला सवड नाहीं.' आणि असें उत्तर देणाऱ्या त्या बद्धांना वाटतें कीं, 'वा:! आपण केवढे सात्त्विक पुरुष हो! कोणाच्या अध्यांत नाहीं, मध्यांत नाहीं. कसे अगदीं सर्व जंजाळापासून अलिप्त आहोंत!' बद्धांच्या या उत्तराचें नि स्वार्थी समर्थनाचें खंडन करण्यासाठीं कांहीं मोठ्या तत्त्वज्ञानांत शिरण्याचें कारण नाहीं. "जो अन्न देतो उदरासी। शरीर विकावें लागे त्यासी। मां जेणें घातलें जन्मासी। त्यासी कैसें विसरावें?॥" याच न्यायानें, ज्या समाजानें तुला आजवर वाढविला, ज्या धर्मानें व संस्कृतीनें तुझी आत्मिक उन्नति नि ऐहिक उत्कर्ष करून दिला, जी भूमि होती म्हणून तुझे वाडवडील सुखसंपदा मिळवूं शकले त्या समाजाचें, धर्मसंस्कृतीचें नि भूमीचें कांहींच ऋण तुझ्यावर पडत नाहीं काय? पोटाची टीचभर खळगी भरण्या न भरण्याइतक्या कांहीं रुपड्या जो 'साहेब' तुझ्या हातावर ठेवितो त्याचे अनंत उपकार मानून त्याच्यापुढें गोंडे घोळतांना तुला लाज वाटत नाहीं; पण देशा-समाजासाठीं कसलेंहि लहान वा मोठें कार्य करण्याची पाळी तुझ्यावर आली कीं पडल्याच तुझ्या कपाळाला आठ्या! कां? तुला हें कार्य करणें कांहीं मोठा परोपकार वाटतो? साफ चुकीची समजूत आहे तुझी ही. हें तुझें कर्तव्य आहे! तुला तें केलेंच पाहिजे; आणि तें करावयाची सिद्धता नसेल तर येथलें कांहींहि बरोबर न घेतां हिमालयाची वाट चालूं लाग कसा! अर्थात् त्याहि पर्वतराजावर तुला पाय

ठेवण्याचा वस्तुत: अधिकार नाहींच; एवढेंच नव्हे, तर तुझ्या मृत्यू-नंतर तुझें प्रेतहि या पवित्र भरतखंडाच्या कोणत्याहि जल वा स्थल-प्रदेशांत पडण्यास पात्र नाहीं; तथापि ही उदारधी भरतभूमि तुझ्यावर तेवढी कृपा करील. आणि जसें कोणाहि हिंदु व्यक्तीला– राष्ट्रीय घटकाला– ही समष्टि आपत्तींत असतां केवळ वैयक्तिक स्वार्थाकडे पाहून आपल्या संसाराच्या संकुचित कोंडाळ्यांत खुरडून बसतां येणार नाहीं; तद्वतच कोणी आपल्या वैयक्तिक आत्मिक उन्नतीच्या मागें लागून समष्टीच्या हिताकडे नि ऋणाकडे डोळेझांक करील तर तोहि दंडार्हच समजला जाईल. "ऋणानि त्रीण्यपाकृत्य मनो मोक्षे निवेशयेत् । अनपाकृत्य मोक्षं तु सेवमानो पतत्यधः ।" असें भगवान् मनूनेंहि सांगितलें आहे. हिंदु समाजांतील बद्धांची संख्या शक्य तितक्या त्वरेनें कमी करून त्यांना राष्ट्रीय मोक्षमार्गावरील मुमुक्षूच्या स्थितींत आणून सोडणें हें प्रत्येक हिंदु संघटकाचें कार्य आहे. (३–४–४२)

* * *

## ते हे मुमुक्षु

"संसारदु:खें दुखवला । त्रिविधतापें पोळला । निरूपणें प्रस्तावला । अंतर्यामीं ॥" (दास. ५.८.३) हिंदु समाजांतील बद्धांचा विचार आपण गेल्या वेळीं केला. आतां मुमुक्षूंचा विचार करूं. संसार-दु:खांनीं दुखवला किंवा त्रिविध तापांनीं पोळला याचा अर्थ पारमार्थिक भावेंतच घ्यावयास नको; आपल्या चालू परिस्थितीकडेहि ही समर्थोक्ति लावून पाहातां येईल. हिंदुस्थानांतील धनसंपन्न असलेला असा थोडा वर्ग सोडला, तर सर्वसामान्य समाज दारिद्र्यांत पिचत असलेला आपल्याला दिसेल. दारिद्र्यदोषामुळें उत्पन्न होणाऱ्या नानाविध आपत्तींत सांसारिक संकटेंहि कमी नसतात. ना पैसा, ना स्वास्थ्य, अशा अवस्थेत संसारांत भांडणें, त्रास उत्पन्न होऊन अनेक प्रकारांच्या दु:खांनीं अंत:करण विह्वल होऊन जातें, विटतें. वैयक्तिक,

प्रापंचिक नि सामाजिक अशा कोणत्याहि बाबतींत स्वास्थ्य वा समाधान नाहीं, पुरेसा पैसा नाहीं; म्हणून शरीर बिघडलेलें. आणि शरीर बिघडल्यामुळें मनहि विकृत होऊन गेलेलें. अशा परिस्थितींत कांहीं सात्त्विक माणसें परमार्थमार्ग धरितात आणि समाजाला विसरतात. तशींच कांहीं अगदीं थोडीं या दुःखपरंपरेचा विचार करूं लागतात. या वैयक्तिक दुःखाचें सामाजिक स्वरूप व त्याच्या बुडाशीं असलेला आपला पारतंत्र्यांतील विघटितपणा हें कारण त्यांच्या प्रत्ययाला येतें. आणि त्यानंतर त्यांतील कांहीं थोडे तें दुःखाचें मूळ नष्ट करण्यासाठीं कांहीं तरी करावें या उद्देशानें पुढें सरसावतात. मग विचार करतां करतां त्यांना कळूं लागतें कीं, 'आपण इतके दिवस ज्या तऱ्हेनें वागत आलों ती तऱ्हा अनिष्ट व चुकीची आहे.' "म्हणे मी काय आपस्वार्थी। म्हणे मी काय अनर्थी' असे स्वतःचे दोष त्याला दिसूं लागतात; आणि आत्मनिरीक्षण जसजसें तो करूं लागतो तसतसें त्याला कळून येऊं लागतें कीं, 'आपण आपल्या स्वतःच्या वैयक्तिक जीवनाच्या खुराड्यांत व्यर्थ कुढत बसलों होतों आजवर. आपल्या कुटुंबाप्रमाणेंच आपल्या देशांत आणखी लक्षावधि कुटुंबें नांदत आहेत, त्यांचा विचार आपल्या मनाला एकदांहि शिवला नाहीं. समाजानें मला दुःख देऊं नये, मला माझ्या संसारांत कांहीं कमी पडतां कामा नये, असें इच्छित असतां आसपासच्या माणसांच्या इच्छेचा नि सुखाचा विचार आपण केला नव्हता.' याच पश्चात्तापदग्ध मनाच्या विचारांतून मुमुक्षु प्रगत होत असतो. असे हजारों मुमुक्षु आपापलीं पश्चात्तापदग्ध मनें उघडीं करून प्रकटपणें बोलूं लागले म्हणजे देशांत 'जागृति' झाली असें म्हणतात. या हृदयांची ओळख एकमेकांची एकमेकांना पटूं लागली म्हणजे 'चळवळ' निर्माण होऊं लागते. आणि तींच हृदयें परस्परप्रेमानें व एकध्येयात्मकतेनें परस्परांशीं एकरूप होऊन गेलीं म्हणजे त्यांची 'संघटना' बनते.

आपल्या आसपास वर वर्णन केल्याप्रमाणें बरेच मुमुक्षु असतील;

त्यांचीं 'संकेतचिन्हें' ओळखून त्यांच्याशीं परिचय करून घेतला पाहिजे. या परिचयाचा स्नेहांत आणि त्या स्नेहाची कार्यसिद्धींत परिणति करून घेणें आवश्यक असतें. तें काम करण्याकरितां जाणत्या व प्रगत राष्ट्रीय मुमुक्षूंनीं 'साधका'वस्था प्राप्त करून घेण्यासाठीं त्वरित प्रयत्न केला पाहिजे. (१४--४-४२)

* * *

## साधकावस्था

"अभ्यासाचा संग धरिला। साक्षपासरिसा निघाला।
प्रेत्न सांगाती भला। साधनपंथें॥" (दास. ५.९.५५)

राष्ट्रीय मोक्षश्रीच्या प्राप्तीचा सात्त्विक हेतु मनांत धरून संघटनेच्या साधनपंथाला लागलेला साधक कसा असतो वा असावा याचेंहि विवेचन समर्थांच्या शब्दांत उत्तम प्रकारें करतां येईल. मी स्वत: कोण आहें याचें, म्हणजे आत्मज्ञान अतएव जाज्ज्वल्य हिंदुत्वाची आत्म-प्रतीति ज्याला होऊं लागली आहे; केवळ स्वार्थानें लिडबिडलेल्या संकुचित कौटुंबिक संसाराच्या लिप्ततेचें बंधन ज्याचें तुटून गेलें आहे; आणि राष्ट्ररूप साकार परमेश्वरावर त्याची जी अनन्य निष्ठा निर्माण झाली आहे, ती दृढ करण्यासाठीं ज्यानें साधनेचा अभ्यास सोडलेला नाहीं, त्याला साधक म्हणावें. याहिपुढें "थोरपणासि पाडिलें। वैभवासि लिथाडिलें। महत्त्वासि झिंजाडिलें। विरक्तिबळें॥" अशी ज्याची स्थिति झाली तोच खरा साधक. थोरपणाच्या पाठीमागें लागलेल्या देशभक्तांनीं प्रसंगीं अंध होऊन आपल्या थोरपणाच्या लोभानें देश-हितावर कळत वा न कळत निखारा ठेवल्याचीं उदाहरणें शोधावयास हिंदुस्थानाच्या मागच्या इतिहासांत जाण्याचीच कांहीं आवश्यकता नाहीं. १९२० ते -४० च्या भारताच्या दुर्दैवी कालखंडांत उपरोक्त कीर्तिलोभी 'पुढाऱ्यां'चीं नि सामान्यांचीं काळीं नांवें आपल्या धन्यांचीं दुष्कृत्यें जगाला ओरडून सांगत आहेत. वैभवाच्या भरीं भरून स्व-

जनद्रोह करणारे लब्धप्रतिष्ठित फितूर तर या दुर्दैवी भारताच्या गेल्या सहस्र दीडसहस्र वर्षांच्या संमिश्र इतिहासांत शेंकड्यांनीं सांपडतील. आणि 'मी कोणीतरी आहें, माझें महत्त्व कोणीं अवमानितां वा अमान्य करतां कामा नये' या व्यक्तिगत अहंकारमदाच्या धुंदीमुळें कित्येक राष्ट्रहितकरी संस्था नि चळवळी धुळीला मिळाल्या; सहस्रावधि राष्ट्रवीरांनीं स्वप्राणांच्या आहुति देऊन, राष्ट्रशकट स्वातंत्र्याच्या दिशेनें त्यापूर्वीं जितका पुढें नेला होता तितकाच किंबहुना त्याहूनहि मागें खेंचण्याचें महत्पाप अशा 'महत्त्वाकांक्षी' व्यक्तींनीं केलें एका व्यक्तीच्या 'महत्त्वा'साठीं समष्टीनें केलेल्या अमोल त्यागावर पाणी पडलें आहे !

पण झाल्यागेल्याबद्दल दुःख वा संताप करून घेण्यांत लाभ नाहीं. यापुढें अनंत भविष्यकाळ आम्हां तरुण पिढींतील उत्साही संघटकांसाठीं परमेश्वरानें मोकळा ठेविला आहे; परिस्थितीनें जणूं आपल्याला आव्हान दिलें आहे. 'दाखवा तुमची कर्तबगारी' असेंच ती जणूं सांगत आहे. यास्तव ज्यांनीं मुमुक्षुस्थिति ओलांडून साधकावस्था प्राप्त करून घेतली आहे, त्यांनीं ज्या दोषामुळें आजवर झालेल्या भारतीय चळवळींचा विनाश झाला, त्या दोषापासून सर्वस्वीं अलिप्त राहून प्रत्यक्ष कार्याला 'शुभस्य शीघ्रम्' म्हणून प्रारंभ केला पाहिजे. 'अमकें केलें तर तमकें होईल नि अमुक एक दिशेनें गेलों तर तमुक अडचणी येतील' ह्या अनुमानबत्तिशीचा खेळ आतां पुरे झाला ! "कल्पना करी उदंड कांहीं । प्राप्तव्य तों कांहींच नाहीं । अखंड पडिला संदेहीं । अनुमानाचे ॥" असें न घडावें. प्रत्यक्ष कार्य घडवीत जसजसें वर जावें तसतसें कार्याचें क्षितिज मोठमोठें होत गेलेलें दिसेल. हिमालयाच्या दक्षिण पायथ्याशीं उभें राहून 'तिबेटांतील रम्य निसर्गश्री कुठें दिसत नाहीं ती' असें म्हणून तेथेंच हातपाय गाळणारांना ती नयनरम्य नि आल्हादक निसर्गश्री पाहण्याचा आनंद केव्हांच लाभणार नाहीं. त्यासाठीं इंचाइंचानें व मैलोमैल तो

नगाधिराज हिमाचल चढून जाऊन त्याच्या गगनचुंबी शिखरावर आरूढ झालें पाहिजे. (२८-४-४२)

*     *     *

## हे खरे राष्ट्राचे पुढारी

साधनपंथ क्रमून 'सिद्धा'वस्थेंत प्रवेश करणें सोपें नव्हे. कारण "बाह्य साधकाचे परी । आणि स्वरूपाकार अंतरीं । सिद्धलक्षण तें चतुरीं । जाणिजे ऐसें ॥" (दास.८.९.१२) असें समर्थांनीं म्हटलें आहे. साधनांचा त्याग तर करावयाचा नाहीं; म्हणजे सामाजिक नीतिबंधनें व संघटनेनें ठरविलेली कार्यप्रणाली सोडावयाची तर नाहीं; आणि तशांतच सिद्धाची स्थिति अंगीं बाणवावयाची. मात्र "संदेह-रहित साधन । तेंचि सिद्धांचें लक्षण ॥" हें अवश्य लक्षांत ठेविलें पाहिजे. स्वरूपाकार म्हणजे ध्येयरूपच होऊन गेलेले आणि लोभ-मोहादि क्षुद्र मानवी विकारांच्या अतीत झालेले पुरुष म्हणजे राष्ट्रीय सिद्ध.

राष्ट्राच्या प्रपंचालाच स्वतःचा प्रपंच मानून त्याच व्यापांत सदा रत असा तो असतो. तो रागावलेला तर कधींच दिसत नाहीं. स्वार्थ ही भावनाच जेथें अस्तित्वांत नसते तेथें स्वार्थासाठीं लोभमोहादि पापांचीं मुळें संभवतील तरी कशीं ? बरें, मानापमान नि स्वतःचें व्यक्तित्व याचा वासवारासुद्धां तेथें पाहावयास सांपडणार नाहीं. सदा कार्याचाच विचार करीत समोर येईल त्या क्षुद्र वा महान् व्यक्तीशीं सारख्याच प्रेमानें व आपुलकीनें आपले विचार बोलत राहाणें हाच त्याचा दिनक्रम. पण त्यांतहि 'आपण कोणी मोठे पुढारी, प्रेषित वा महात्मे' असला अहंभाव नाहीं. जसे समपातळींत असलेल्या बैठकी-वर उभयतां बसलेले तसेंच वैयक्तिक योग्यता समान लेखून बोलणें. मग तेथें नवकोटनारायणाचें स्वागत ज्या पद्धतीनें होईल त्याच पद्धतीनें दरिद्रीनारायणाचेंहि ! 'बोलण्यासारिखें चालणें । स्वयें करूनि बोलणें' अशा वर्तनानें अलोट प्रबोधशक्ति संपादून तद्द्वारा सकळांचीं

अंतरें जणूं त्याला माहीत झालेलीं. आपल्या समाजांतील लहान-थोरांची सेवा करण्याकरितांच जन्म घेऊन आलेला अशी त्याची सदैव वृत्ति ! असे अनेक सिद्ध आपल्या समाजांत निर्माण होतील तरच आपल्या समाजाची ही मृतावस्था संपून तो पुरा सजीव बनेल. वर वर्णन केलेल्याप्रमाणें किती सिद्ध आज आपल्या पाहाण्यांत आहेत ? कोणींहि उठावें आणि स्वतःला 'पुढारी' म्हणवून लांब लांब गप्पा मारावयास लागावें ही आजची स्थिति आहे. ही पालटली पाहिजे; नव्हे, आपण ज्वलन्त हृदयाच्या तरुणांनीं ती पालटविली पाहिजे. तें आपल्याच हातीं आहे. वठलेले वृक्ष जसे सुफलित होऊं शकत नाहींत तसेच ते पांथस्थांना शीतल छायाहि पुरवूं शकत नाहींत. तथापि कोणी त्यांचा उपहास करतां कामा नये; कारण त्या वृक्ष-श्रेष्ठांनीं आपल्या तारुण्यांत आपलें कर्तव्य बजावलेलें आहे. जीं विझलेलीं यज्ञकुंडें आहेत त्यांतून ज्वाला उफाळण्याची अपेक्षा करूं नका; त्यांतील ज्वलनसामर्थ्य संपून गेलेलें आहे. पण तरीहि त्यांचा धिक्कार करूं नका. जे निस्तेज झालेले दीप आहेत, त्यांना नमस्कार करा हवा तर; त्यांची अवहेलना मात्र कधींच करूं नका. पण त्यां-कडून प्रकाशाची वा मार्गदर्शनाची अपेक्षाहि करूं नका.

आणि म्हणून, जे आपल्या ज्वलन्त अंतःकरणांतील धगीनें आसपासची उदासीन मनोवृत्ति वितळवीत आहेत, ज्यांच्या हृदयां-तील विशुद्ध भावना स्फटिकाप्रमाणें स्वच्छ प्रकाशानें विरोधकांचे डोळे दिपवीत आहेत, आणि ज्यांचें शरीर व मन आपल्या अनुयायांबरोबरच अग्रभागीं अविरत धांवत आहे तेच खरे राष्ट्राचे पुढारी होत. त्यांचाच मार्ग अनुसरण्यांत राष्ट्राचें कल्याण आहे. (अप्रकाशित)

* * *

## दुसरा कोण बरें पुढें येईल ?

हिंदुस्थानांतील राष्ट्रीय संघटनेचे घटक म्हणजे, आजकाल तथा-कथित देशभक्तीच्या नि राजकारणाचा जो प्रवाह चालला आहे, त्या-

विरुद्ध पोहत जाणारीं माणसें आहेत. हा प्रवाह केवळ अचंचळ अशा देशकल्याणाच्या हेतूपासून निर्माण झाला असला तरी तो "अधोमुखें वळें चालिला" आहे. जे निष्ठावंत संघटक या प्रवाहाच्या उलट दिशेनें निघाले आहेत त्यांना राष्ट्रकल्याणाचा जो मूळ पर्वत, कीं जेथून हा प्रवाह उगम पावला, तो पर्वत गांठावयाचा आहे. परंतु त्या प्रवाहांत "येक ते वाहातचि गेले। येक वळशामध्यें पडिले। येक सांकडींत आडकले। अधोमुख ॥ येक आपटआपटोंचि गेलीं। येक चिर्ड-चिडोंचि मेलीं। कीतीयेक तीं फुगलीं। पाणी भरलें ॥" तथापि त्यांत असेहि कांहीं पट्टीचे पोहणारे निघतात कीं जे "एक बळाचे निवटले। ते पोहतचि उगमास गेले। उगमदर्शनें पवित्र जाले। तीर्थरूप ॥" ज्यांचें लक्ष उगम-पर्वतावरून ढळतें, अथवा ज्यांना उलट जाणाऱ्या प्रवाहाचा वेग सहन होत नाहीं, ते आपला उगमाकडील प्रवास मध्येंच अर्धवट सोडून कांठाला लागण्याचा प्रयत्न करितात. आणि त्यांत ते संघटनेची तीक्ष्ण नि बलवान धार कापतां न आल्यामुळें गटंगळ्या खाऊन मरून जातात.

हिंदूंनीं संघटित होऊन सामर्थ्यसंपन्न बनावें यासाठीं यत्न करणारांना परकीय प्रस्थापित सरकारापासून स्वतःच्या समाजांतील आपल्याच रक्ताच्या भावापर्यंत अनेकांकडून भयंकर विरोध सहन करावा लागेल. परंतु जे खरेखुरे जातिवंत संघटक, निष्ठावंत संशमक आहेत, ज्यांना आपल्या प्रिय मातृभूमीच्या दास्यविमोचनाच्या कार्याशिवाय अन्य व्यवहारच जिव्हाळ्याचा वाटत नाहीं, आणि ज्यांच्या देहज्योति अ-राष्ट्रीयतेच्या नि विघटनेच्या अंधारांत, चांचपडणाऱ्या आपल्या दीन देशबांधवांच्या मार्गदर्शनाकरितां अखंड जळत आहेत अशांनीं मरणाला हांक मारूनच हें सतीचें वाण हातीं घेतलें आहे. अशांना श्रीसमर्थांच्या भाषेंत 'महंत' म्हणतां येईल. या राष्ट्रीय महंतांची परंपरा जशीच्या तशीच अखंड चालू ठेवण्याचें दायित्व प्रत्येक हिंदु तरुणावर आहे. मग तें कर्तव्य बजावतांना आपल्या साऱ्या वैयक्तिक आशा-

आकांक्षांचा चुराडा उडाला आणि सर्वस्वाची होळी पेटली तरी त्याची तमा धरतां कामा नये ! फक्त एकच दिवस जरी पूर्ण अंतर्मुख होऊन आपण आपल्या मनाला प्रश्न केलात कीं, 'या कार्याची धुरा जर मी स्वतः उचलणार नाहीं, तर ती दुसरा कोण बरें आपल्या शिरावर घेण्यासाठीं पुढें येईल ?' तर या प्रश्नाचें उत्तर 'दुसरा कोणीहि नाहीं' यापेक्षां अन्य कोणतें बरें येऊं शकेल ? (अप्रकाशित)

*　　*　　*

## आम्हांला एक विशिष्ट ध्येय आहे

सर्वसामान्य जनतेला बाह्यांगावर भुलून जाण्याची संवय असते. ढोलाच्या आवाजाचा मोह सामान्य समाजाला चटकन् पडतो; पण त्याला कळत नसतें कीं, हा ढोल रिकामा आहे आणि म्हणूनच त्याचा आवाज एवढ्या मोठ्यानें निघत आहे ! ज्यांना देशासाठीं 'कांहीं तरी' करण्याची इच्छा आहे अशा कार्यकर्त्यांना कांहीं तरी 'कार्यक्रम', 'विधायक कार्यक्रम' पाहिजे असतो. ज्या संस्थांचा 'कार्यक्रमांच्या योजनां'चा डंका मोठा आवाज करीत असेल त्यांच्या ध्वजाखालीं हे कार्यकर्ते धांवून जातात; कारण त्यांना हें कळलेलें नसतें कीं, कार्यक्रमांच्या योजना ठरविणें हेच काय ते त्या संस्थांचे 'विधायक' कार्यक्रम असतात. लहान मुलें ज्याप्रमाणें भडक रंगाच्या वस्तु व आवाज करणारीं खेळणीं यांकडे चटकन् आकर्षिलीं जातात त्याप्रमाणें 'कांहीं तरी' करूं इच्छिणारे उत्साही तरुण व्यासपीठावरील जहाल वक्तृत्वाला नि भडक योजनांना बळी पडतात.

पण भावनेच्या लाटेबरोबर आकाशांत उंच उंच उड्डाण करणें, हा तारुण्याला साजेसा उन्माद असला, तरी तो उन्माद आहे हें कधींच विसरून जाऊं नये. 'कांहीं तरी' करावयाचें म्हणून नव्हे, तर निश्चितपणें 'अमकें' हेंच घडवावयाचें असें ठरवून त्यासाठीं यज्ञवेदीवर चढणारे तरुण राष्ट्रनिर्मिति करूं शकतात, गेलेलें स्वातंत्र्य परत

मिळवितात, छिन्नभिन्न झालेलें राष्ट्रमंदिर पुनश्च उभें करून त्यावर वैभवाचा कळस चढवितात.

आपल्याला या हिंदुराष्ट्राच्या मंदिराचा पुनरुद्धार करून त्यावर वैभवाचा कळस चढवावयाचा आहे. हें कार्य करूं इच्छिणारांनीं संघटनाशास्त्रांतील एक महत्त्वाचा सिद्धान्त अवश्य लक्षांत ठेवला पाहिजे कीं, 'कांहीं तरी करावयाचें म्हणून नव्हे तर एक विशिष्ट ध्येय साधावयाचें म्हणून संघटना जन्म पावलेली असते.' संघटनेचें बाह्यावरण बदलेल, कदाचित् तिचे मार्गहि बदलतील; पण तिच्या ध्येयांत कदापि बदल होणार नाहीं. दरवर्षीच्या अधिवेशनांत इतर संस्थांप्रमाणें तिच्या साध्यांत बदल होत गेलेला कोणाला दिसणार नाहीं. तिच्या धोरणांत परिस्थित्यनुरूप फरक पडण्याची कदाचित् शक्यता आहेहि; परंतु तिच्या ध्येयांत, तिच्या साध्यांत, कधींहि कोणतीहि तडजोड असूं शकत नाहीं. कारण ध्येयांत तडजोड म्हणजेच त्या संघटनेचें मरण ! आम्हांला हा हिंदु समाज या हिंदुस्थानांत वैभवशाली करावयाचा आहे. बस्स ! हेंच आमच्या संघटनेचें साध्य. त्यांत तडजोड, फरक, बदल, माघार, कांहीं कांहींच व कदापिहि घडूं शकणार नाहीं. नाहींपेक्षां आम्ही आमचें ध्येय साध्य करण्याऐवजीं 'कांहीं तरी'च करून बसूं ! आमचें ध्येय अढळ आहे आणि तें गांठण्यासाठीं आम्ही आमचे मार्गहि आजपर्यंतचा इतिहास लक्षांत घेऊन निश्चित करून टाकले आहेत. कोणाला कार्यक्रमच पाहिजे असेल, तर हिंदु समाज संघटित अतएव सामर्थ्यसंपन्न करणें हा कांहीं कार्यक्रम होऊं शकत नाहीं का ? घसा फुटेपर्यंत व्याख्यान ओरडणें किंवा शाई फुटेपर्यंत लेख खरडणें हाच काय तो कार्यक्रम होऊं शकतो काय ? एका माणसानें आपल्यासारख्याच रक्ताच्या दुसऱ्या माणसांशीं बोलावें, त्याला आपलासा करून घ्यावा आणि असें 'लोकीं लोक वाढवून' त्यांची संख्या अमर्याद करावी हा केवढा कार्यक्रम ! ही केवढी शक्ति ! आणि अशी बलाढ्य शक्ति एकदां निर्माण झाल्यावर ती अखेर समुद्रांत नेऊन बुडवावयाची

हाच का त्या शक्तिधारकांचा अंतिम उद्देश असेल ? इतके का ते मूर्ख आहेत ? अरे, जिनें आपलें सामर्थ्य कणाकणानें सांठविलें व क्षणाक्षणानें एकत्र केलें त्या संघटनेला अखेर त्या शक्तीचा कांहींच 'विशिष्ट' उपयोग करावयाचा नसता तर तिनें हा भलता खटाटोप केला असता तरी कशाला ? पण "करावयाचें बोलों नये। बोलायाचें लेहों नये" हें अवश्य लक्षांत ठेवावें. (अप्रकाशित)

संशप्तकांशीं हितगुज : : : : ३

## दृष्टि चळूं देऊं नका

जगांत अनेक चांगल्या गोष्टी आहेत. एखाद्या खेळणींवाल्याच्या भव्य दुकानांत गेल्याबरोबर लहान मुलाला जसें हें घेऊं का तें घेऊं असें होऊन जातें, तशी स्थिति आज हिंदु तरुणांची झाली आहे. बहुरत्ना वसुंधरेच्या पोटांतील अनेक रत्नांच्या एकत्रित दर्शनानें हिंदु तरुण पिढीचें मन गोंधळून गेलें आहे. हें विश्वबंधुत्व, ही जागतिक संयुक्त राज्यघटना, जगताची शांति, स्वास्थ्य, स्वातंत्र्य, नाझीवादाचा नाश नि लोकशाहीची स्थापना, फॅसिझमचा नायनाट नि कामगारराज्याची निर्मिति. एक ना दोन सहस्रावधि विलोभनीय तत्त्वें आज हिंदुस्थानाच्या राष्ट्रीय तरुण पिढीचीं मनें आकर्षून घेत आहेत. आज प्रसंग मोठा आणीबाणीचा आहे ! हिंदुसंघटकांनीं या विलक्षण काळांत आपली ध्येयदृष्टि क्षणमात्रहि विचलित होऊं देतां कामा नये. राष्ट्रीय उत्थानाच्या पवित्र नि महनीय कार्यांत साऱ्यांच्याच सहकार्याची आवश्यकता असते. कोणी डोक्याचे मुत्सद्दी तर कोणी मनगटाचे सैनिक; कोणी शक्तीनें युक्त तर कोणी युक्तीनें वरिष्ठ; आणि "शक्तीनें मिळती राज्यें। युक्तीनें यत्न होतसे। शक्ति युक्ति जये ठायीं। तेथें श्रीमंत धांवती ॥" हा न्याय त्रिकालाबाधित आहे.

म्हणून आवश्यकता आज कसली असेल, दक्षता कशाची घ्यावयाची असेल, तर एवढीच कीं, या मुत्सद्द्यांच्या डोक्यांतून हिंदुस्थानाच्या राष्ट्रीय हिताला घातक योजना बाहेर पडणार नाहींत; सैनिकांच्या मनगटांतील शक्ति हिंदुराष्ट्राचा स्वातंत्र्यप्रासाद उभविण्यासाठींच उपयोगी पडतील !

थोडें थांबा ! आपल्याला "दुरिताचें तिमिर" नष्ट करून "जो जें वांच्छील तो तें" प्राप्त करून घेईल, अशी स्थिति या जगांत उत्पन्न करावयाची आहे. पण जरा दमानें घ्या. शिडीच्या एकएका पायरीनें चढून गेलांत तर अखेरची पायरी गांठाल. नाहींपेक्षां खालीं कोलमडून स्वतःचा कपाळमोक्ष नि कार्याची हानि यांतच विव्हळत पडावें लागेल. प्रथम तुमच्या मायदेशावरती जर तुम्ही प्रेम करूं शकत नसलां तर जगावर प्रेम करण्याची स्थितप्रज्ञाची भाषा कशाला ? आपल्यावरील अन्याय दूर करण्याची इच्छा नि शक्ति नसेल तर जगतावरील अन्यायाच्या परिमार्जनाची पोपटपंची काय कामाची ? वास्तव आज एकच एक मार्ग आहे— संघटकांस सूचना ! संघटना ! संघटना ! ! (२९–७–४२)

* * *

## राष्ट्रीय संघटनेची आवश्यकता

राष्ट्रीय संघटनेची आवश्यकता संकटाच्या परिस्थितीमुळें उत्पन्न होते असें मुळींच नाहीं. कोणाहि सजीव प्राण्याला जिवंत राहावयासाठीं प्राणवायूची जितकी आवश्यकता अपरिहार्यतेनें असते तितकीच संघटनेची आवश्यकता राष्ट्रजीवनाला आहे. आपण असें कोठें पाहिलें आहे का, कीं नगरांत आग लागल्याची वार्ता कळल्यानंतर नगराधिकाऱ्यानें आगवाल्यांना आग विझविण्याचें शिक्षण देण्यास प्रारंभ केला आहे ? तद्वतच राष्ट्रावर संकट प्राप्त झालें आहे; देशांत दंगेधोपे माजले आहेत; मायभू पारतंत्र्यपंकांत रुतून बसली आहे; किंवा जगांत संहारक महायुद्धाचा डोंब उसळला आहे; म्हणून संघटनेची

गरज आहे असें नव्हे. तशी कल्पना कोणीं तुमच्या मनांत रुजविली असेल तर ती चुकीच्या पायावर आधारलेली नि परिणामीं घातक ठरणारी आहे हें लक्षांत आणा. कारण मुसलमान तुमच्यावर हल्ले करतात म्हणून तुम्ही सुदृढ, बलवान् नि निकोप प्रकृतीचे व्हा असें सांगणें जितकें हास्यास्पद, तितकेंच तुम्ही परतंत्र आहांत, परकीय तुमच्यावर जुलूम करतात यास्तव संघटित होण्याची आवश्यकता प्रतिपादणें हें निरर्थक होय. कारण या विचारसरणींतून पुढें ओघानेंच असें सिद्ध होतें कीं, स्वास्थ्य, शांतता नि सुव्यवस्था यांच्या काळांत राष्ट्र वा समाज विघटित झाला, निदान संघटित राहिला नाहीं, तरी चालेल ! ही चूक आम्ही समजलों नाहीं म्हणून तर ही दशा आली !

म्हणून— कोणत्याहि आपत्कालामुळें किंवा देशावर परचक्र येऊं पाहात आहे यासाठीं नव्हे, तर आमचा हा हिंदूंचाच— आणि दुसऱ्या कोणाचाहि नसलेला— भारतवर्ष या जगांत स्वधर्म, स्वसंस्कृति, स्वराष्ट्रीयत्व नि स्वातंत्र्य यांच्यासह मानानें जगावा नि उत्कर्ष पावावा यास्तव हिंदुराष्ट्रीयांनीं म्हणजे हिंदूंनीं आपली राष्ट्रीय संघटना करणें अत्यावश्यक आहे. (१५-८-४१)

* * *

## विराट् राष्ट्रपुरुषाची निर्मिति

राष्ट्राच्या जीवनाला राष्ट्रीय संघटनेची आवश्यकता आहे; त्याशिवाय राष्ट्र जगूं शकत नाहीं. इतकें ठरल्यानंतर त्या संघटनेच्या शास्त्राचा विचार केला पाहिजे. संघटना या शब्दांतच अनेक घटकांचें एकत्रीकरण, दृढीकरण, एकजीवता हा अर्थ समाविष्ट आहे. आणि यास्तव संघटना— मग ती कसलीहि, कामगारांची असो नाहीं तर व्यापाऱ्यांची असो— म्हटली म्हणजे व्यक्तित्वावर निर्बंध पडलाच. एकाहून अधिक माणसें ज्या ठिकाणीं एकत्र होतील त्या ठिकाणीं संघशक्तीच्या निर्मितीसाठीं त्या मनुष्यसमूहांतील प्रत्येक माणसानें आपल्या व्यक्तित्वाचा पसारा आवरून घेतलाच पाहिजे. जसें स्वातंत्र्य या

शब्दांत त्याशीं संबद्ध असणाऱ्या घटकांवर कोणत्या ना कोणत्या प्रकारानें कांहीं विशिष्ट निर्बंध घालणें हा अर्थ सामावलेला असतो तसेंच संघटना या शब्दांत व्यक्तिगत स्वातंत्र्याला कांहीं विशिष्ट मर्यादा घालणें असा अर्थ समाविष्ट असतो. 'निर्बंधता' हा तर संघटनेचा सूत्रशब्द आहे. कारण एक विशिष्ट विचार-उच्चार-आचारपद्धति असल्याविना संघटनेला शिस्त लागत नाहीं; आणि ज्या ठिकाणीं शिस्तीचें सूत्र नाहीं त्या ठिकाणीं कितीहि महान् कर्तबगार व्यक्ति एकत्र जमल्या नि त्यांनीं डोक्यांवर डोकीं घांसलीं तरी कार्यनिर्मितीच्या नांवानें शून्याकारच दिसेल! संघटनेची शिस्त संघटनेच्या घटकांना सर्वथा शिरोधार्य असली पाहिजे.

संघटना ज्या माणसांची उभारावयाची त्यांतील प्रत्येक घटकानें संघटनेच्या सीमारेषेंत पाऊल ठेवतांनाच आपलें बंडखोर, वैयक्तिक मानापमानाचें नि स्वार्थसाधनाच्या तामस व राजस इच्छेचें गाठोडें प्रथम बाहेर फेकून द्यावयास हवें. तूं मोठा विद्वान् आहेस ना? तुझी सारी विद्वत्ता राष्ट्रीय संघटनेच्या सरितेंतून अखेर राष्ट्रोद्धाराच्या सागराला जाऊन मिळाली पाहिजे. तूं कोण? कुशल कलावान् आहेस का? मग तुझ्या कलेंतील सर्व कौशल्य याच प्रवाहांतून राष्ट्रीय समुत्थानाच्या महासागरांत समाविष्ट करून टाक. तुझ्यापाशीं अलोट संपत्ति आहे? ठीक तर. तुझ्या त्या द्रव्याचा ओघ याच मार्गानें अखेर देशकल्याणाच्या विशाल पात्रांत मिळून जावयास हवा. आणि तुझ्यापाशीं काय अलौकिक शरीरसामर्थ्य आहे का? बरें, ती तुझी शक्ति याच दिशेनें राष्ट्रोन्नतीच्या अफाट जलनिधींत मिळून जाऊं दे. आणि अशा साऱ्या विद्या, कला, द्रव्य नि शरीरशक्ति सारें सारेंच समष्टीच्या अनन्त स्वरूपांत तद्रूप होऊन गेलें म्हणजे जो विराट् राष्ट्रपुरुष निर्माण होईल त्याला जगांत कोणती गोष्ट अशक्य आहे?

(२९-८-४१)

* * *

## कोल्हेकुईला भिऊन कार्य सोडूं नका

खरोखर, असा जो विराट् राष्ट्रपुरुष निर्माण केला जाईल, म्हणजे तुम्ही-आम्ही करूं, त्याला मग काय अशक्य आहे? पण कोणी शंकात्मे विचारतात, 'अहो असा हा हिंदुराष्ट्रपुरुष निर्माण होण्याचीच अगोदर शक्यता आहे का?' ज्यांच्या अंतःकरणांतील चैतन्य केधींच नष्ट होऊन गेलें आहे ते असें म्हणतात, 'छट्, या निव्वळ बाता आहेत.' ज्यांच्या आत्मविश्वासाचें खोबरें झालें आहे ते उद्‌गारतात, 'अहो, ही गंधर्वनगरींतील कल्पना आहे, कल्पना नुसती! स्वप्न आहे!' आपल्या बुद्धिवादित्वाची मशाल दिवसाउजेडीं पेटवून मिरविणारे 'पंडित' 'भावनेच्या आहारीं गेलेल्या निर्बुद्धांची चळवळ' या शब्दांनीं याची हेटाळणी करतात. तर राष्ट्रकल्याणाचा मक्ता एकट्या आप-ल्याच हातीं काय तो सोंपविलेला आहे असें समजणारे कित्येक दे. भ. 'जातीय पुढाऱ्यांची राष्ट्रघातकी हुल्लड' अशी तिची कुचेष्टा करण्याचा प्रयत्न करतात.

पण बाबांनो, तुम्हांला हें माहीत आहे का, कीं श्रीशिवाजीमहा-राजांनीं हिंदुपदपातशाहीची तेजस्वी घोषणा जेव्हां पहिल्यानें केली तेव्हां अशीच कोल्हेकुई या राष्ट्रांत सर्वत्र माजून गेली होती! आणि आपण असेंहि पाहिलें नाहीं का, कीं निर्हिंदु भारत बनविण्याची 'कसम' खाऊन सिंहासनावर चढलेला 'दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा' असा मोगल सम्राट् अखेर त्याची दुष्ट इच्छा साध्य न होतांच निराशेचे दीर्घ निःश्वास टाकीत आपल्या थडग्यांत कायमचा झोंपीं गेला!!

आणि त्या वेळीं तर फक्त एकटा महाराष्ट्र जागा झाला होता. आज तर दक्षिण समुद्रापासून हिमाचलापर्यंत नि कॆट्टयापासून कल-कत्त्यापर्यंत सारा भारतवर्ष खडबडून उठला आहे. शिवाजीमहा-राजांच्या वेळची राष्ट्रीय गर्जना 'मराठा तितुका मेळवावा' ही होती, तर आजच्या राष्ट्रीय गर्जनेंत 'अखिल हिंदु तेवढा संघटित करावा

असें सर्वव्यापी आवाहन आहे. मग काय बरें अशक्य आहे आपल्याला ? म्हणूं तर सारें विश्व आर्यमय करून टाकूं. पण जर का हातपाय गाळून रडूं लागूं कीं, 'आमची एकटी हिंदु जाति काय करणार ?' तर– तर मात्र ही हिंदु जाति आपल्या साऱ्या पुरातन वैभवासह एकदां कायमचीच कालाच्या ओघांत नष्ट होऊन जाईल.

कोल्हेकुईला भिऊन शिवछत्रपति हातपाय गाळून स्वस्थ वसते तर आज आपण हिंदु या नांवाला पारखे झालों असतों. तसेंच ह्या आधुनिक कोल्हेकुईला घाबरून हातचें कार्य सोडून देऊं तर पुढें सारा अंधःकार होईल. आज आतां दृढ निश्चयानें, संशयातीत होऊन, दुश्चितपणा सोडून त्या विराट् राष्ट्रपुरुषाच्या निर्मितीसाठीं जें कांहीं कण कण साहाय्य आपल्यांपैकीं प्रत्येकाला देतां येईल तें त्यानें अवश्य देत राहिलें पाहिजे. मात्र हें प्रचंड कार्य दोन दिवसांत पुरें होईल या वेड्या अपेक्षेनें नव्हे ! (१६–९–४२)

* * *

## राष्ट्रीय संघटनेची अमरज्योत

'रोम एका दिवसांत बांधलें गेलें नाहीं' अशी पाश्चिमात्यांची एक म्हण आहे. अधःपाताच्या खोल गर्तेत गाडलें गेलेलें हें हिंदुराष्ट्र पुनश्च वैभवशिखरावर आणून विराजमान करण्याचें महत्कार्य आपण हातीं घेतलें आहे. आणि कित्येक विद्वानांच्या मतें ही एक अशक्य कोटींतील गोष्ट फाटलेल्या आकाशाला ठिगळें लावण्यासारखी हास्यास्पद कथा होऊन बसली आहे. तथापि आपणां हिंदुसंघटकांचा विश्वास दुर्दम्य आहे कीं, ही अशक्यप्राय वाटणारी कल्पना आपण प्रत्यक्ष व्यवहारांत उतरवूंच उतरवूं ! पण हळदीचा घोट घशाखालीं जातो न जातो तोंच आपलें काळें शरीर किती गोरें झालें म्हणून पाहूं लागणाऱ्या स्त्रीसारखें अधीर होऊन चालणार नाहीं.

असें जर कोणाला वाटत असेल, कीं कांहीं हजारांच्या देणग्या दिल्या, कांहीं माणसांनीं ४-८ वर्षें कारावास सोसला, कांहीं थोड्यांशा

त्यागी पुरुषांनीं आपल्या घरादारावर नांगर फिरूं दिला, म्हणजे स्वातंत्र्याची माला भारतमातेच्या गळ्यांत पडलीच !— तर ती भ्रामक कल्पना आहे. त्यासाठीं जरा जगांतील इतर राष्ट्रांनीं स्वातंत्र्यप्राप्तीस्तव केलेल्या संगरांचे इतिहास अवलोकिले पाहिजेत. मॅक्स्विनी-व्हॅलेराचें शूर आयर्लंड गेलीं सुमारें ७०० वर्षें पूर्ण स्वातंत्र्यासाठीं झगडा चालवीत आहे. काय चिकाटी ! मॅझिनी-गॅरिबाल्डीच्या पुरातन इटलीनें सातत्यानें लढविलेला स्वातंत्र्याचा लढा खरोखरीच अवश्य अभ्यसनीय आहे. आणि त्यावरून आपल्याला काय दिसून येईल ? रक्ताच्या नद्या वाहतात, संकटांचे पर्वत कोसळतात, पिढ्यांच्या पिढ्या कापल्या जातात, लक्षावधि राष्ट्रवीरांचे बळी पडतात आणि शतावधि कुटुंबेंच्या कुटुंबें धुळीला मिळतात; तेव्हां स्वातंत्र्याचें बीज रुजण्यास भूमि लायक होते. त्यानंतर तिची मशागत करण्यांत अनेक वर्षें वा प्रसंगीं दशकेंहि खपत राहावें तेव्हां वैभवाचें पीक डोलूं लागतें. इटली, जर्मनी, रशिया, इंग्लंड कोणत्याहि राष्ट्राचा इतिहास पाहा. काय दृष्टोत्पत्तीला येतें ? हरघडीला अपमान गिळावा, दर पळाला विकारांचा लगाम खेंचावा, प्रतिक्षणाला डोकें वर काढूं पाहणाऱ्या स्वार्थी वृत्ति ठेंचाव्या, तेव्हां राष्ट्राची संघटना उभी राहाते. थेंबाथेंबानें रक्त सांडीत राहावें, कणाकणानें झिजत मरावें, क्षणाक्षणानें संथपणें जळत देशबंधूंचा मार्ग प्रकाशित करीत पुढें जावें तेव्हां संघटनेंत सामर्थ्य निर्माण होतें. आणि मग त्या सामर्थ्यांत किंचितहि उणेपणा न राहूं देण्यासाठीं, तें सर्वांगपूर्ण नि अखंड राखण्यासाठीं, त्या संघटनेचा प्रत्येक घटक जेव्हां राष्ट्रसंवर्धनाकरितां प्रज्वलित केलेल्या त्या पवित्र यज्ञकुंडांत 'राष्ट्राय स्वाहा । राष्ट्राय इदं न मम ।' म्हणून कांहींहि न वगळतां सर्वस्वाचें हवन करण्यास सज्ज होतो तेव्हां यथार्थतेनें जिवंत, स्वाभिमानी नि तेजस्वी राष्ट्र या संज्ञेस तो देश पात्र होतो !

आपल्या उदात्त तत्त्वज्ञानाच्या रक्षणा-सवर्धनासाठीं मरणारीं नि

मारणारीं, ध्येयाच्या तीव्र तळमळीनें जळणारीं नि जाळणारीं, दुर्दम्य आत्मविश्वासानें रसरसलेलीं जिवट-चिवट, वीरधीर अशीं प्रतिज्ञाबद्ध माणसेंच फक्त राष्ट्रीय संघटना उभारूं शकतात. आणि म्हणून आज हिंदुस्थानांत राष्ट्रीय संघटनेचें व्रत स्वीकारलेल्यांनीं ही गोष्ट अवश्य लक्षांत ठेवावी कीं, 'रोम एका दिवसांत बांधलें गेलें नाहीं!' पत्त्यांचा बंगला दोन मिनिटांत उभा राहतो तर नुसत्या फुंकरानें सुद्धां क्षणार्धांत कोलमडून पडतो. उलट दगडाची भक्कम इमारत उभारण्यास वर्षानुवर्षें लागतात, पण झंझावाताला नि धरणीकंपालाहि दाद न देतां ती अचलपणें शतकानुशतकें उभी राहूं शकते!....एका दिवसांत किंवा एका वर्षांतहि स्वराज्य आमच्यापाशीं नाहीं; हें सतीचें वाण घेऊन आमरण, अखंड कार्य चालवावयास सिद्ध असाल तर या पवित्र कर्मभूमींत पाऊल टाका; नाहींपेक्षां चळवळी नि वळवळी आजपर्यंत काय थोड्या झाल्या? पण आम्हां आजच्यां तरुण हिंदूंना अशी एक अमरज्योत पेटवावयाची आहे, कीं जी 'यावच्चंद्रदिवाकरौ' तेवत राहून मानवजातीला कल्याणाचा मार्ग दाखवीत राहील.

(२०-९-४१)

* * *

## राष्ट्रमंदिराच्या पायाचे दगड

तुम्ही एकादी इमारत बांधतांना पाहिली असेल. तिचा पाया घालतांना त्यांत किती दगड, चुना नि इतर कणखर पदार्थ लोटून तो भरावा लागतो त लक्षांत असेल तुमच्या. इमारत जितकी भव्य नि प्रचंड बांधावयाची असेल त्या मानानें त्या इमारतीचा पाया भरभक्कम, मजबूत घालावा लागतो. तसेंच आपल्या राष्ट्रमंदिराचें आहे. आपण हिंदुराष्ट्राची ही धुळीला मिळालेली, उध्वस्त होऊन गेलेली, नामशेष झालेली इमारत पुनश्च पहिल्यापासून उभारावयास प्रारंभ केला आहे; आणि आज कोठें तिच्या पायाचें काम सुरू झालें आहे. या पायांतील दगडांचें महत्त्व काय नव्यानें सांगायला हवें? आपली आजची

संबंध पिढी किंवा तींतील महत्त्वाचा भाग या पायांतच गाडावा लागणार आहे असें सांगितलें तर तुम्हांला वाईट कां वाटावें ? होय, हें खरें आहे कीं, पायांत दबलीं गेलेलीं तुमचीं पवित्र नांवें इतिहासकारांना कदाचित् माहीतहि होणार नाहींत. राष्ट्राकरितां 'कांहीं तरी करण्याच्या' तीव्र तळमळीनें पुढें सरसावलेले तुमच्यासारखे क्रान्तिवीर काळाच्या ओघांत गडप होऊन जातील. कोणी तुमच्या नांवानें अश्रू गाळणार नाहीं; तुमचे पुतळे उभारून नि स्मारकें करून तुमचीं स्तुतिस्त्रोत्रें गाणार नाहीं. तरी चिंता नाहीं. शिवछत्रपतींचा मार्ग जेव्हां रसरसलेल्या निखाऱ्यांच्या खंदकांनीं अडवून धरला तेव्हां शिवरायांच्या अनुयायांनीं स्वतःच्या देहाचा पूल उभारून रस्ता तयार करून दिला, तो रोमांचकारी प्रसंग आपल्याच स्फूर्तिशाली इतिहासांत घडला ना ? कार्यसिद्धीसाठीं स्वप्राणांची आहुति देऊन पावनखिंडीचा पराक्रम गाजविणारा कर्तव्यनिष्ठ बाजी आपलाच पूर्वज ना ? अप्रसिद्धीच्या खोल गर्तेत स्वतःला गाडून घेऊन राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठीं महान् कार्य उभविणारे क्रांतिदूत याच भारताच्या बंग, पंजाब आदि प्रांतांच्या कुशींत जन्मले ना ? स्वराज्य शब्दसुद्धां आम्हां अर्वाचीन भारतवासीयांना कळत नव्हता त्या वेळीं आपल्या घरावर स्वहस्तें तुळशीपत्र ठेवून जे क्रांतिकारक देशकाजासाठीं बाहेर पडले नि अज्ञात असेच विनाश पावले, त्यांच्यासाठीं कोणीं केव्हां अश्रु ढाळले असतील काय ? त्यांचे पुतळे, स्मारकें नि मंदिरें उभारून त्यांचा गौरव कोणीं केला असेल काय ? इतकेंच नव्हे, तर त्यांची स्मृति तरी तुम्हीं-आम्हीं आज जिवंत ठेविली आहे का ?—खरोखरी किती कृतघ्न आहोंत आपण, कीं अर्वाचीन हिंदुस्थानाचा इतिहास लिहितांना त्या थोर हुतात्म्यांची नुसती आठवण, नुसतें अस्तित्वहि, जाणवूं नये आम्हांपैकीं कांहींना !

पण ते खरेखुरे थोर होते. ते तथाकथित 'पुढारी' नव्हते; ते कार्याचे नि तत्त्वाचे पुजारी होते. स्वतःला सेनापति म्हणवून अनु-

यायांना राष्ट्रीय स्वातंत्र्यापासून दूर न्यावयाचें नव्हतें त्यांना; ते खरे निष्ठावंत सैनिक होते. आपल्या नांवाचा डांगोरा सर्वत्र पिटला जावा ही स्वार्थी इच्छा ठेविली नव्हती त्यांनीं; मायभूच्या विजयाचा डंका दिगंत गाजविण्याची इच्छा बाळगिली होती त्यांनीं. राष्ट्रमंदिराच्या कळसावर चमकण्याची एक प्रकारची स्वार्थी अपेक्षा नव्हती त्यांची; उलट त्या मंदिराच्या पायांतील दगड बनून ते आपल्या शरीरावर ती इमारत उभी करीत होते.

आणि, तरुण हो, अद्यापि या सुभव्य भवनाच्या पायाचें काम पुरें झालेलें नाहीं. कळसाची मनोरम कल्पना मनांत आणून तेथें चमकण्याची वेडी अपेक्षा बाळगूं नका इतक्यांत. अजून पायाच पुरा भरून व्हावयाचा आहे; त्यानंतर अनेक मजले वर चढविले जातील. हें भारतभवन गगनाला चुंबण्याइतकें उंचच उंच उभारलें जाईल; आणि त्यानंतर जो कोणी महाभाग तेथें त्या वेळीं उपस्थित असेल तो आपल्या सर्वांच्या तपश्चर्येच्या बळावर त्यावर कळस म्हणून विराजमान होईल. आपल्यांपैकीं कित्येकांना

'Unwept, unhonoured, and unsung'

असें येथून निघून जावें लागेल. मला माहीत आहे कीं, अप्रसिद्धीच्या अंधकारांत नष्ट होऊन जातांना आपल्याला वाईट वाटेल. पण कोणीं वेड्यानें तुम्हांला सांगितलें कीं, हें सर्व तुम्ही तुमच्या स्वतःच्या सुखासाठीं करीत आहां म्हणून ? "सौख्यधाम स्वातंत्र्याचें नसे अम्हांसाठीं । भव्य भावि कालामधल्या हिंदु पिढ्यांसाठीं ॥" तुम्हांला सौख्य ? – छेः छेः ! हें बोलूनचालून रण पडलें आहे. येथें दुःख, यातना, अपेष्टा मात्र वांट्याला यावयाच्या. या जीवितरूप कार्यक्षेत्रांत, ऐषआरामानें लोळण्यासाठीं विधात्यानें पाठविलेलेंच नाहीं आपल्याला. तसा भ्रम कांहींना असेल तर कठोर वस्तुस्थिति आपला चाबूक त्यांच्या पाठीवर हाणून त्या मोहनिद्रेंतून त्यांना जागें केल्याखेरीज कधींच राहाणार नाहीं ! (३१–१०–४१)

## कार्यसिद्धीची किल्ली—आपलेपणा

हिंदुस्थानाच्या राष्ट्रीय संघटनेसाठीं सन्नद्ध झालेल्या तुम्हांला एक खुणेचा शब्द सांगू का ? आपलेपणा ! या शब्दाच्या किल्लीनें तुमच्यापुढें आ वासून उभीं राहिलेलीं सारीं कोडीं उलगडतील; एवढा संकेताचा, परवलीचा शब्द तुम्हांला कोणत्याहि दुर्गम समस्यांच्या चौकीपहाऱ्यांतून अंतःप्रदेशांत प्रवेश मिळवून देईल; वनदाट संकटारण्यांत हा एकटाच शब्द तुमचा सांगाती होऊं शकेल.

आपलेपणा ! काय जादू आहे पाहा या शब्दांत ! एवढें मोठें स्वराज्यसंस्थापनेचें बिकट कार्य 'चिमुकल्या' शिवाजीनें कसे पार पाडलें ? घरच्या सरदारीवर लाथ मारून हुतात्म्या भगतसिंगांनीं फांशीला कां कवटाळलें ? सुखाचा मानसन्मान झिडकारून स्वा. तात्यारावांनीं दुःखाच्या पर्वतांना कां आवाहन केलें ? या असामान्य घटना घडविण्याचें सामर्थ्य एकाच शब्दांत आहे. आपलेपणा ! हिंदु समाजाविषयीं, हिंदुस्थानाविषयीं आपलेपणा या थोर माणसांच्या अंतःकरणांत नसता तर त्यांच्या हातून त्यांपैकीं कांहीं तरी अलौकिक कार्यें घडतीं का ? हा हिंदु समाज माझा आहे, हें राष्ट्र, यांतील दगडधोंडे नि नद्यानाले किंवा संस्कृति नि इतिहासपरंपरा हीं माझीं आहेत, असा आपलेपणा अंतःकरणांत जागृत असल्याशिवाय का कुठें कार्य घडतें ? साधें उदाहरण पाहा; आपलें स्वतःचें घर स्वच्छ ठेवा असें नगरांतील आरोग्यखात्याच्या अधिकाऱ्यानें तुम्हांला येऊन सांगावें लागतें का ? ज्या घरांत तुम्ही राहातां तें 'आपलें' आहे ही जाणीवच तुम्हांला तें स्वच्छ ठेवावयास शिकविते; प्रसंगीं भाग पाडते. म्हणच आहे ना एक 'अग्नीशिवाय कढ नाहीं अन् मायेशिवाय रड नाहीं.' अगदीं खरें आहे तें. अशीच माया स्वदेशासंबंधीं, स्वसमाजाविषयीं, स्वतःचा धर्म नि संस्कृति यांच्या ठायीं निर्माण झाली पाहिजे. अशी माया ज्या ठिकाणीं वसते त्याच ठिकाणीं या 'आपल्या' वाटणाऱ्या गोष्टीचें कल्याण साधण्याची, हित करण्याची, त्यावरील

अत्याचार नि अन्याय यांचें परिमार्जन करण्याची तळमळ लागते; आणि या तळमळींतूनच कार्याचा अंकुर जन्म घेतो. अशा अंकुरांतून वाढलेल्या रोपांची लावणी म्हणजे संघटना. त्यांचें पीक पिकलें कीं देश-धर्म-समाज समृद्ध होतो; बलवान् बनतो.

आणि एकदां तुमच्या अंतःकरणांत आपुलकीच्या, आत्मीयतेच्या जाणीवेनें आपलें आसन स्थिर केलें, कीं महान् संकटांचे पर्वतहि जरी कोसळले, किंवा आपदांचा झंझावात सुटला, तरी तुम्हांला तो स्वीकृत कार्यापासून रतिमात्रहि ढळवूं शकणार नाहीं. आत्मीयतेची तळमळ, मायेचा कढ नसेल तर मात्र कोणीं तरी काम करावयास सांगावयाची किंवा प्रसंगीं ओझें लादण्याची आवश्यकता उत्पन्न होते. आणि अंतःकरण जर खरोखरीच स्वदेशप्रेमानें जळत असेल, आपल्या समाजावर प्रत्यहीं कोसळणाऱ्या दुःखांविषयीं जर आपल्या काळजाला घरें पडत असतील, तर त्या देशाच्या बऱ्यासाठीं, त्या समाजाच्या उन्नतीसाठीं, कष्ट नि त्याग करावयास सांगण्याकरितां व्यासपीठावरून वक्त्यांना आपले घसे फुटेपर्यंत ओरडण्याची तरी काय आवश्यकता? तशी तळमळ ज्यांच्या अंतःकरणांत निर्माण झाली त्यांनीं 'आपल्या आयुष्याचें कसें होईल' याचा 'व्यवहारवादी' विचार न करतां सरळ-च कार्याच्या रंगणांत उडी घेतली; आणि त्यांचें कार्य न्याय्य, उदात्त नि पवित्र असल्यामुळें परमेश्वरहि त्यांचा साहाय्यकारी झाला. पण अशी मूळची आंचच जिथें नसेल तिथें कार्याच्या पाण्याला कढ येऊन अन्नसिद्धि व्हावी कशी? तुम्ही असें आतां, या क्षणीं पाहात नाहीं का, कीं इंग्लंड, जर्मनी, रशिया इत्यादि मोठमोठ्या देशांतील कोवळीं पोरें देशभक्तीचीं गाणीं गात आपल्या राष्ट्राच्या नि समाजाच्या इभ्रतीसाठीं, कशाकशाचीच चिंता न बाळगतां, सारे प्रेमाचे नि सुखाचे बंध ताड ताड तोडून रणांगणाकडे निघालीं! त्यांना काय कोणीं व्याख्यानें दिलीं होतीं? लोकमान्यांचें उदारण दिलें तर ती एक असामान्य विभूति होती म्हणून तुम्ही म्हणाल. पण विशीहि

न उलटलेला कान्हेरे नि संसाराच्या परिसरांत नुकताच प्रवेश करणारा बालमुकुंद या देशभक्तांना काय कोणीं शनिवारवाड्यापुढें भाषणें देऊन चेतविलें होतें ? ती ज्योत आंतून पेटलेली असावी लागते; जसें 'शिकविलेलें शहाणपण नि बांधून दिलेली शिदोरी' पुरी पडत नाहीं, तसेंच उसनें घेतलेलें वा बाहेरून चिकटलेलें देशप्रेम कार्याची तड केव्हांच लावूं शकणार नाहीं हें पक्कें ध्यानांत ठेवा. पण ज्या अर्थी तुम्हीं स्वयंस्फूर्तीनें कार्याला हात घातलेला आहे त्या अर्थी ती ज्योत आंतून पेटलेली आहे खास. आणि म्हणून मनाची जी टोंचणी लागली आहे तिच्याकडे दुर्लक्ष न करतां या क्षणीं मिळेल त्या संधीचा पुरेपूर फायदा घेऊन कार्याची गति वाढविणें नि त्याचा विस्तार करणें हेंच कर्तव्य आहे. (१८-११-४१)

* * *

## 'वन्ही तो चेतवावा रे'

मला माहीत आहे, या दुर्दैवी भारतांत अशीं कांहीं अंतःकरणें तीव्र संतापानें जळत व क्रोधानें मुठी आवळत आहेत. दिवसाढवळ्या होणारे अत्याचार-अन्याय ऐकून, पाहून नि अनुभवूनहि अधरोष्ठ चावण्यापलीकडे वा अधिकांत अधिक तर आत्माहुति देण्यापलीकडे ज्यांना कांहींच करतां येत नाहीं अशीं— थोडीं का होईनात— माणसें मला दिसतात. पण कठिण दगडावर कपाळ आपटलें तर कपाळमोक्ष होतो; तो दगड दुभंगत नाहीं, त्याला पाझरहि फुटत नाहीं ! म्हणून दगड फोडण्यासाठीं, त्या कठिण पाषाणाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडविण्यासाठीं कठिणतर लोखंडाचे प्रचंड घण बनवून ते हातीं घ्यावे लागतात. होय, तुमच्या अंतःकरणांत नुसता कल्लोळ उडून गेला आहे. पण नुसत्या तळमळीनें मनांत जळून काम भागणार नाहीं. आणि तसेंच भर सार्वजनिक चौकांत आपली तीव्र तळमळ नि अनावर संताप व्यक्त करून आपल्या विरोधकांवर तुम्ही शिव्याशापांचा केवढाहि वर्षाव केलात तरी त्यानेंहि त्यांचें कांहीं वांकडें होणार

नाहीं. त्या बोलण्यामागें कृतीची तपश्चर्या व संघटनेचें सामर्थ्य केवढें उभें आहे यावरच सारें अवलंबून राहील. प्रतिकूल परिस्थितीचा गळफांस कर्तुमकर्तुम् सामर्थ्याच्या महापुरुषापासून क्षुद्र, प्रवाहपतित माणसापर्यंत साऱ्यांच्याच मनाभोंवतीं पडलेला असतो. त्यांतूनच कुशलतेनें, धीरानें व शान्त चित्तानें मार्ग काढावा लागतो. आपण आज पाहातों कीं, आम्हां हिंदुस्थानाच्या राष्ट्रीय समाजांतील माणसांना श्वासोच्छ्वास करण्याचेंहि स्वातंत्र्य नाहीं. आणि मग अशा परिस्थितींत कोणी विराट् राष्ट्रीय संघटनेच्या गोष्टी बोलूं लागला म्हणजे आमच्यांतलेच कांहीं जळणारे जीव हताशपणें उद्गारतात, 'छे हो! कांहीं घडणार नाहीं अशानें; आम्ही असेच कुजत मरायचे!' पण लक्षांत ठेवा, तुम्ही माणसें– जिवंत माणसें, नि त्यांतहि तरुण– आहांत. जिवंत तरुणाची बुद्धि गडद अंधारांतूनहि मार्ग काढूं शकते; त्याचीं मनगटें कठिण वज्राचाहि चुरा करूं शकतात! पण तुम्हांला आज तसें कांहीं करण्याची आवश्यकता नि इष्टता नाहींच मुळीं. फक्त एक साधी, सोपी गोष्ट करतां येईल तुम्हांला. कोणती?— 'वन्ही तो चेतवावा रे!' कारण तो 'चेतवीतांचि चेततो' अशी 'रोकडी प्रचीती' राष्ट्रगुरु समर्थ रामदासांनीं एक वेळ दाखविलेली आहे. एक तुमचें स्वतःचें अंतःकरण तळमळीनें धुमसत अखेर संतापानें पेटलें आहे ना? ठीक तर! अशीं तुमच्या आसपासचीं, जवळचीं व दूरचीं एक, दोन, नव्हे हजारों, लक्षावधि अंतःकरणें पेटवून द्या. मैलोमैल पसरलेलें खांडववन जाळणारा प्रचंड अग्नि प्रथम एका लहानशा ठिणगींतूनच निर्माण झाला ना? एकाच ज्वलन्त देशभक्तानें सारा इटाली एके काळीं पेटवून दिला हें खरें ना? अशी एक ठिणगी जर वणवा पेटवूं शकते तर अनेक ठिणग्या एकत्र झाल्या म्हणजे काय होणार नाहीं?

वातावरणांत भावनेच्या वाऱ्याचा जोर आहे आज. आजच वन्हि चेतवूं लागलों तर हां हां म्हणतां चेतेल तो! (९–१२–४१)

## जीवन राष्ट्रमय बनलें पाहिजे

पारतंत्र्यपंकांत रुतलेल्या या पुरातन देशाला पुनरपि वैभवाच्या शिखरावर आरूढ करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या राष्ट्रीय तरुणांना माझें कळकळीनें एकच सांगणें आहे– बंधूंनो, तुमचा सर्व व्यवहार राष्ट्रीय आकांक्षेच्या पवित्र सूत्रांत ओवला गेला पाहिजे! तुम्हांला, तुमचा हा भारतवर्ष परतंत्र आहे आणि त्या लाजिरवाण्या अवस्थेंतून त्याला मुक्त करावयाचें आहे, याची जाणीव ज्या पहिल्या क्षणीं झाली त्या पहिल्या क्षणापासून तुमचे सारें जीवन राष्ट्रमयच बनून गेलें पाहिजे. आज आपल्या आजूबाजूचें वातावरण किती कुजट, नासकें नि घातक आहे पाहा. उत्तमोत्तम विदेशी वस्तूंचा भपका नि आकर्षक परकीय विचारांची लकाकी हीं विलोभनें जणूं आपल्याला अहमहमिकेनें स्वतःकडे ओढून घेत आहेत. अशा परिस्थितींत या राष्ट्राच्या तरुण पिढीपैकीं किती घटकांच्या अंतःकरणांत राष्ट्रीयत्वाची ज्योत तेवत असेल ?

आणि म्हणून मी म्हणतों कीं, हें फार मोठें, नव्हे हेंच काय तें सर्वोच्च महत्त्वाचें आजचें कर्तव्य आहे आपलें. राष्ट्रीय जागृतीची ज्योतच जिथें पेटलेली नाहीं त्या ठिकाणीं राष्ट्रव्यापी चळवळीच्या गोष्टी कशाला ? कर्तव्यविन्मुख होऊन इतस्ततः भटकणारे सारे तरुण आपले आहेत. त्यांतील प्रत्येकाला जाणीव करून देणें आवश्यक आहे कीं, 'हें जीवन चैन करण्यासाठीं परमेश्वरानें– वा निसर्गानें म्हणा पाहिजे तर– तुला दिलेलें नाहीं. तूं ज्या राष्ट्रीय समाजाचा, धर्माचा नि संस्कृतीचा घटक म्हणून जन्माला आलास त्याचें नांव, त्याचें नातें वा त्याच्याविषयींचें तुझें कर्तव्य यांपैकीं तूं कांहींच विसरूं शकत नाहींस; तीं तुला विसरतां येणार नाहींत. कारण, जर तुला या समाजांत, या भूमीवर जगावयाचें नि जीवन कंठावयाचें आहे तर तुझ्या जीवनावर, तुझ्या सर्वस्वावर, या थोर मातृभूमीचा अवश्य अधिकार आहे. तूं उदासीन राहूं शकत नाहींस; कारण तुझे जे

भोजनपानादि व्यवहार चाललेले आहेत त्या द्रव्यांतील प्रत्येक कणन् कण या पुरातन भरतभूमीनें निर्माण केलेला आहे. तुला देशव्यापी राष्ट्रीय संघटनेपासून विभक्त राहातांच येणार नाहीं. कारण विघटित असणें हा महान् राष्ट्रीय अपराध आहे.'

माझी खात्री आहे कीं, आपला हा हिंदु समाज सर्वथा ऱ्हासाच्या, अवनतीच्या कितीहि खोल गर्तेत जाऊन पडला असला तरी निदान त्यांतील तरुणांचीं मनें अजून पूर्णतः कुजून गेलेलीं नाहींत; त्यांत अजूनहि, थोडीच, पण धुगधुगी आहे. राष्ट्रीय कर्तव्याचें ज्ञानामृत पाजून अद्यापहि त्यांना जिवंत व नंतर बलिष्ठ करतां येईल; मात्र तें कार्य फार कष्टदायक, दुर्घट नि प्रसंगीं कंटाळवाणेंहि आहे. परंतु त्याला काय करणार? संन्याश्याच्या लग्नाला शेंडीपासून तयारी करावी लागते; तसेंच या उजाड माळरानावर आपल्याला स्वातंत्र्याचें पीक डोलवावयाचें आहे. आणि त्याकरितां मृतप्राय झालेल्या या रोपट्यां-वर नि झाडांवर राष्ट्रीय आकांक्षांचें जल सिंचून प्रथम त्यांना टवटवी आणणें आवश्यक आहे! या पुरुषप्रयत्नांतून असा एक काळ निर्माण होईल, कीं ज्या वेळीं हें अखिल हिंदुराष्ट्र राष्ट्रीय वृत्तींनीं पूर्ण जागृत, संघटित नि अतएव बलाढ्य असें जगासमोर उभें राहील. त्या जागृतीचें, संघटनेचें नि बलाचें काय करावयाचें हा प्रश्न मग त्या वेळींच विचारणें श्रेयस्कर ठरेल; पण त्या वेळीं आपण सर्वच त्या संघटनेचे अविभाज्य घटक होऊन राहाणार असल्यामुळें वरील प्रश्नाचें उत्तर देणारे आपले आपणच असूं! (१९-१२-४१)

* * *

## हिंदूंच्या सामर्थ्याचा खरा उपयोग

"हिंदूंची संख्या जास्त आहे, त्यांची परंपरा मोठी आहे, मनोनिग्रह व सोशिकपणा त्यांच्यांत आहे—ह्याचा उपयोग आजपर्यंत आमच्या गळ्याभोंवतींचीं दास्यत्वाचीं बंधनें घट्ट आवळण्याकडे झाला; आतां त्याचा उपयोग हीं बंधनें कमी करण्याकडे झाला पाहिजे!"

'भारतीय असंतोषाचे जनक' लोकमान्य टिळक यांच्या ओजस्वी वाणींतून प्रकट झालेला हा संदेश या आणीबाणीच्या काळांत प्रत्येक हिंदूनें अवश्य मनन करण्यासारखा आहे. लोकमान्यांच्या स्मृतीचे उत्सव गेलीं एकवीस वर्षें आपण करीत आलों; वाढत्या उत्साहानें चालवीत आलों; पण त्यांनीं घालून दिलेल्या मार्गावर आपण किती प्रगत झालों? एकदां मागें वळून पाहा. सिंहावलोकन करा. समीपच्या भूतकालांत काय दिसेल? आपण त्या थोर पुरुषानें दर्शविलेल्या कल्याणकारी मार्गापासून बरेच दूर गेलों आहोंत. नाहींपेक्षां त्यांच्या कारकीर्दींत आलेली सुवर्णसंधि जशी त्यांना, आम्हां राष्ट्रीय जनतेच्या असिद्धतेमुळें, वायां दवडलेली पाहावी लागली, तशीच एक संधि पुनश्च लाभली असतां तिचा कोणताच फायदा न घेण्याइतके दुर्बल आम्ही कसे राहिलों असतों?

'आमच्यांतील फूट हें शत्रूचें कवच' असें जें लो. टिळकांनीं म्हटलें आहे त्याचा अर्थ समजण्यास एवढा एकवीस वर्षांचा अवधीहि आपणांस पुरा-पडला नाहीं. पण सुदैवानें आमच्यांतील विचारवंतांना आतां हें समजून चुकलें आहे कीं, आपण मार्ग चुकलों होतों; लोकमान्यांच्या राजकारणाचें मर्म लोकांना समजलें नव्हतें. आतां ते उमजले आहेत. तेव्हां 'माझ्या प्रत्येक हालचालींतून नि श्वासोच्छ्वासांतूनहि मी माझ्या प्रिय मातृभूमीचें अतएव राष्ट्राचें म्हणजे हिंदुत्वाचें हित पाहीन' अशा निश्चयानें प्रत्येकानें आपले सारे व्यवहार करणें आवश्यक आहे. (लो. टिळकपुण्यतिथि, १–८–४१)

* * *

## 'ज्यासी ज्यासी येणें त्याणें यावें'

जेव्हां—

तानाजीनें पोटच्या पुत्राच्या लग्नाचा मोह लाथाडून सिंहगडाचें लग्न स्वतःच्या शरीराचें बोहलें सिद्ध करून त्यावर लाविलें; बाजी-

प्रभूनें कार्यसिद्धीचा संकेत मिळेपर्यंत थेंब थेंब रक्त सांडीत मृत्यूलाहि थोपवून ठेविलें; शतावधि मावळ्यांनीं आपल्या व्यक्तित्वाचा लोभ धरून व्यक्तिस्वातंत्र्याची कोल्हेकुई न करितां स्वतःचे देह शिवछत्रपतींच्या पायदळीं अंथरले; हा ब्राह्मण, हा मराठा, हा महार असा भेद न बाळगतां एकाच स्वराज्यसंस्थापनेच्या उदात्त ध्येयानें प्रेरित होऊन जीवन वा मरण याची चिंता न करतां रण लढविलें;—

तेव्हां— भारताच्या स्वातंत्र्यलक्ष्मीनें या पवित्र महाराष्ट्रांत पदार्पण केलें. त्या सहस्रावधि मावळ्यांपैकीं नि शेंकडों राष्ट्रभक्तांपैकीं ज्या अनेकांनीं आपल्या देहाचे चिरे करून स्वातंत्र्यलक्ष्मीचा मार्ग बांधून काढला त्यांपैकीं फारच थोड्यांचीं नांवें दृश्य इतिहासांत नमूद झालीं. आतां—

आम्ही या हिंदुस्थानाचे राष्ट्रीय घटक त्या हुतात्म्यांनीं भगीरथ प्रयत्नांनीं आणिलेल्या स्वातंत्र्यलक्ष्मीच्या स्मृतीचा उत्सव दरवर्षी १० मे दिवशीं साजरा करीत असतों! भयंकर झंझावात सुटला आहे; घनदाट अंधःकार पसरला आहे; शुंडाधारी पर्जन्य कोसळत आहे; अतिसमय प्राप्त झाला आहे. आणि स्वातंत्र्यलक्ष्मीच्या आगमनाचीं हींच प्रसादचिन्हें आहेत. तिची तृषा महाभयंकर असते; तिला नरयज्ञ फार प्रिय वाटतो; भक्तांची कसोटी ती फार कठोरपणें पाहाते. मग आपल्यांपैकीं किती जण तिचें स्वागत करावयास सिद्ध आहेत? तानाजीप्रमाणें, बाजीप्रमाणें आपलें स्वतंत्र, प्रिय असें कांहीं कांहींसुद्धां मागें राखून न ठेवितां तिच्या पायावर वाहावयास किती जण कटिबद्ध झाले आहेत?

अपेक्षा, साऱ्यांनींच सिद्ध असावें अशी आहे; सगळे 'व्यवहारी' विचार बाजूला सारून राष्ट्रीय म्हणून जे जे असतील त्या सर्वांनीं या महायज्ञासाठीं सर्वस्व अर्पिण्याची सिद्धता या क्षणीं करावी अशी आहे. परंतु ही अपेक्षा आहे! ज्यांचीं अंतःकरणें प्रज्वलित झालीं आहेत त्यांना काय चेतवावयाचें? पण ज्यांचीं हृदयें धुमसत आहेत त्यांच्यासाठीं हा फुंकर! त्यांतूनहि —

"वाढीतसे हरी मोक्षाचें वाढणें । ज्यासी ज्यासी येणें त्याणें यावें ॥" यापेक्षा अधिक काय सांगणार ? (स्वातंत्र्यदिन, ८-५-४२)

६७१४

प्रासंगिक : : : : ४

## तुम्हांलाहि समर्थांचें कार्य करतां येईल !

"उदंड करी गुप्तरूपें । भिकाऱ्यासारिखा स्वरूपें । तेथें यशकीर्ती-प्रतापें । सीमा सांडिली ॥" हिंदुस्थानाला राष्ट्रीय संघटनेचा पहिला धडा शिकविणारे व म्हणून यथार्थतेनें राष्ट्रगुरु ठरलेले श्रीसमर्थ रामदास हे एक महान् राजकारणी महंत होते. वर उद्धृत केलल्या ओवींत त्यांच्या थोर व्यक्तिमत्वाच्या व्यावहारिक बाजूचें सम्यक् दर्शन होऊं शकेल. सांसारिक माणसाच्या अगदीं सर्वसामान्य व्यवहारापासून तों तहत राजकारणी मुत्सद्याच्या भयंकर कारस्थानापर्यंत साऱ्या गोष्टींचा ऊहापोह समर्थांनीं आपल्या वाङ्मयांत केलेला आहे. आणि हिंदुस्थानांत कांहीं तरी चैतन्य निर्माण करून स्वराज्यसंस्थापनेचा यत्न करणाऱ्या बहुतेक महाराष्ट्रीय पुरुषांनीं समर्थांच्या शिकवणीचाच उपयोग करून घेतलेला आहे. सारें संघटनाशास्त्र, त्यांतील अगदीं बारीकसारीक तपशिलासह, या साक्षात् कर्मवीरानें सांगितलें आहे. पण आपल्या घरीं गडगंज संपत्ति सांठविलेली असतां भिकाऱ्यासारखें दुसऱ्याच्या दारीं जाऊन पदर पसरून द्रव्ययाचना करण्याची घाणेरडी संवय आपल्याला गेलीं कित्येक वर्षें लागलेली होती; त्यामुळें या संघटनाशास्त्राला आपण पारखे झालों होतों ! आतां सुदैवानें आपण जागृत होऊन आपलें काय काय आहे तें धुंडावयास लागलों असल्यामुळें या क्रांतिकारक संताच्या शिकवणीचीं रत्नें आपल्या हातीं लागत आहेत.

श्रीसमर्थ रामदास या व्यक्तीकडे एक अवतारी पुरुष म्हणून पाहण्यापेक्षां सर्वसामान्य माणसांनीं त्यांना आपल्यासारख्या सर्वसामान्य

माणसांतीलच एक अत्यंत तळमळीचा, प्रामाणिक, अति बुद्धिमान् व कर्तबगार माणूस या दृष्टीनें पाहावें. तसें पाहिलें तरच त्यांच्या जीवनांतून सर्वसामान्यांना कांहीं उचलतां येण्यासारखें आहे. नाहींपेक्षां 'ते काय परमेश्वराचे अवतार ! आम्हां पामरांना त्यांच्याप्रमाणें कसें कार्य घडवितां येईल ?' असें म्हटलें कीं संपलें ! मग आपल्यावर प्रत्यक्ष कार्याचें कांहीं दायित्व राहात नाहीं. 'इतिहासाची पुनरावृत्ति आपोआप घडत नसून थोर पुरुष ती आपल्या कर्तृत्वानें घडवून आणीत असतात' हें आपण विसरून जातों. मग "दासबोधा"-सारखा ग्रंथराज केवळ प्रदर्शनांत ठेवण्याच्या पात्रतेचा हिरा आहे असें आपल्याला वाटूं लागतें. ती एक महाऔषधि असून तिचें सेवन केलें तर प्रचंड शक्ति आपल्यापाशीं संचित होऊं शकेल हें आपल्या लक्षांत येत नाहीं.

पण "रेखा तितुकी पुसोन जाते । प्रत्यक्ष प्रत्यया येतें । डोळेझांकणी करावी ते । काये निमित्य ॥" हा समर्थांचा यत्नवादाचा संदेश जर आपण आपल्या डोळ्यांपुढें सतत ठेविला तर काय घडणार नाहीं ? समर्थांनीं रेखाटलेलें 'आनंदवनभुवना'चें चित्र किती भव्य, उदात्त नि मनोहर आहे ! तें चित्र आपणहि आज या अखंड भारतवर्षांत प्रत्यक्षांत उभें करूं शकूं. काय अशक्य आहे त्यांत ? अहो, जिथें नुसत्या पांचांतून पांच लक्ष उभे राहूं शकतात असा प्रत्यक्ष जिवंत इतिहास आज घडत आहे, तिथें अपयशाची भीति वाटण्याचें काय कारण ? सतरा-अठरा वर्षांपूर्वीं स्वतःला 'हिंदु' म्हणवून घेणें याचीच लोकांना खंत किंवा भीति वाटत होती; आणि आज आपण 'हिंदुस्थान खरेंखरें हिंदु-राष्ट्र करण्याची' भाषा उघडपणें नि मोठ्या अभिमानानें बोलत आहोंत.' पण यांत एवढें मात्र मुळींच विसरून चालणार नाहीं, कीं एवढी क्रांति घडविण्यासाठीं कित्येकांचें रक्त आटलें, हाडें झिजलीं नि प्रसंगीं प्राणहि बळी पडलेले आहेत. "कोंणी येक काम कांहीं । केल्यावीण होत नाहीं ॥" असें

समर्थांनीं निक्षून सांगितलें आहे. आणि इतकी प्रगति जर आपण स्वतःच्या प्रयत्नांनीं करूं शकतों तर आपण आज बोलतों आहोंत तें प्रत्यक्षांत उतरविणें हेंहि प्रयत्नसाध्य नाहीं का ? यत्नालाच देव समजावा असें. समर्थांचें सांगणें आहे. आणि त्या यत्नदेवाचे एकनिष्ठ उपासक बनून जर आपण "लोकीं लोक वाढवीत" गेलों तर "ते अमर्याद" होऊन "भूमंडळीं" "गुप्तरूपानें" आपलीच सत्ता नाहीं का चालवूं लागणार ? त्यासाठीं कांहीं क्रांतीची अगडबंब भाषा बोलून मोहक तऱ्हेनें निराळा फाफटपसारा उभारण्याची आवश्यकताच नाहीं मुळीं ! (दासनवमी–अप्रकाशित)

* * *

## हिंदुमात्रानें उद्यांपासून......?

परमपूज्य डॉक्टर हेडगेवार यांचा जडदेह या लोकांतून निघून गेल्याला उद्यां दि. २१ ला बरोबर एक वर्ष होईल. कांहीं लोकोत्तर महापुरुषांप्रमाणें याहि द्रष्ट्याचा जन्म या लौकिक जगांत त्याच्या मृत्यूनंतर झाला !—आणि जसजसा काळ लोटेल तसतसें जगाच्या प्रत्ययाला येईल कीं—डॉ. हेडगेवार कोण होते. त्यांच्याच एका वाक्यांत त्यांच्या अमर कार्याचें सार सांगतां येईल. 'हिंदूंचा अधःपात शस्त्रामुळें झाला नाहीं' हा तो सिद्धान्त.' आणि याच पायावर त्यांनीं प्रारंभिलेली विराट् संघटना उभी आहे. रोमन साम्राज्यापासून मोगल पातशाहीपर्यंत साऱ्या बलाढ्य शक्ति अधःपतित झाल्या, कालाच्या विशाल उदरांत गडप होऊन गेल्या; पण त्या केवळ शस्त्रास्त्रांच्या सामर्थ्यांत कमी पडल्या म्हणून नव्हे. नुकता नुकता झालेला फ्रान्सचा ऱ्हास काय शस्त्रास्त्रांच्या अभावानें घडवून आणला ? संस्कृति, धर्म व राष्ट्र यांचा विनाशकाल वा ऊर्जितावस्था केवळ शस्त्रबळानें घडून येत नसते. 'सामुदायिक विचार व संघटना' यांच्या अभावामुळें विनाश नि दृढतेमुळें उत्कर्ष घडत असतो त्यांचा. आज आपली हिंदु जाति अधःपाताच्या मार्गाला लागली आहे, विनाशाकडे

वेगानें घसरत चालली आहे. अजून जागे झालों नाहीं तर विनाश दूर नाहीं. म्हणून प्रत्येक हिंदु पुरुषानें उद्यांपासून.......?

(प. पू. डॉ. हेडगेवार स्मृतिदिन, २०-६-४१)

* * *

## बोला कोण कोण सिद्ध आहेत ?

कशाला शब्दांचा खेळ, कशासाठीं वाग्सुमनांचा वर्षाव, कशाकरितां मानपत्रांच्या मालिका नि अमोल कालाची उधळपट्टी ? उद्यां आपल्या स्वा. सावरकरांचा जन्मदिवस आहे. उद्यां त्यांना ५९ वें वर्ष लागतें. कल्पना करा. या गेल्या ५८ वर्षांत या थोर पुरुषानें तुमच्या-आमच्यासाठीं किती आपदा, दुःख, यातना, कष्ट सहन केले? शब्दांनीं नव्हे, कल्पनेनेंहि मोजतां येणार नाहींत ते. काय दिलें त्याबद्दल आपण त्यांना ? ते मागत नाहींत; कारण त्यांची राष्ट्रसेवा निष्काम होती, आहे, राहील. पण आपल्यापाशीं कृतज्ञता म्हणून कांहीं आहे ना ? त्यांच्या कठोर तपश्चर्येचें, अपरिमित त्यागाचें, वीरोचित ज्वलनाचें चीज व्हावें ही एकच इच्छा; ही एकच फेड; ही एकमेव कृतज्ञता. मग त्यांच्या ओजस्वी वाणींतून प्रकट होणारीं व्याख्यानें ऐकणें, प्रसंगीं टाळ्या वाजविणें, नव्हे, त्यांच्या मिरवणुकी काढणें नि त्यांना मानपत्रांच्या वा पुष्पहारांच्या वजनाखालीं भारावून टाकणें यांतून तें चीज साधतां येईल का ? 'तुम्ही थोर, तुम्हीं स्वातंत्र्यवीर देवस्वरूप' अशीं स्तुतिसुमनें उधळून तरी त्यांच्या मनाला समाधान होईल का ? नाहीं, त्रिवार नाहीं ! तुमचे परमप्रिय नि मान्यवर तात्याराव तुमच्यापासून एकच एक अपेक्षा सतत करीत आहेत....ते एकच प्रश्न विचारीत आहेत- 'माझ्यासारखे सातत्यानें, शांतपणें, धीरानें जळणारे अखंड दीप होऊन जळत राहाण्याचें दिव्य व्रत तुमच्यांपैकीं किती जणांनीं घेतलें आहे ?'

सांगा, सबंध आयुष्यभर, क्षणभरहि न विचलित होतां, एकाच ध्येयताऱ्यावर दृष्टि स्थिरावून, संथपणें, निर्भयपणें, कठोर निश्चयानें

मार्गक्रमण करणारे किती हिंदु वीर पुढें येतात ? सावरकर आज गेलीं तीन तपें सारखे होम करीत बसले आहेत; कधीं भावना तर कधीं प्रत्यक्ष शरीराचाहि कांहीं भाग ते या अमर राष्ट्रीय यज्ञांत अर्पीत राहिले आहेत; अजूनहि त्यांचें हें यज्ञकर्म संपलेलें नाहीं ! बोला, या पुण्यदिवशीं स्वातंत्र्यवीरांना स्मरून सांगा, आपल्या प्रिय हिंदु राष्ट्रासाठीं आपल्या सर्वस्वाचा असा अखंड यज्ञ चेतवावयास कोण कोण सिद्ध आहेत ? (स्वा.सावरकर जन्मदिन, २७-५-४१)

* * *

## स्वामी श्रद्धानंद यांच्या हौतात्म्याशीं कृतज्ञता

हुतात्मा स्वामी श्रद्धानंद यांच्यानंतरहि गेल्या चौदा वर्षांत हिंदूंतील अनेक धर्मवीरांच्या रक्ताचें इस्लामच्या रक्तपिपासू सुऱ्यानें प्राशन केलें. दि. २३ डिसेंबर १९२६ दिवशीं अबदुल रसीदनें त्या वृद्ध संन्याश्याच्या छातीवर भ्याडपणें गोळ्या चालविल्या. स्वामीजींनीं आम्हां हिंदुधर्मीयांसाठीं स्वप्राणांची आहुति हिंदुसंघटनेच्या वेदीवर समर्पित केली.

वीर संन्यासिन् ! धन्य तुझी ! पण तुझ्या अमोल त्यागाचें मूल्य जाणण्याइतका हिंदु समाज जाणता नव्हता; अद्यापि पूर्णतया नाहीं. एका यःकश्चित् माणसाला धक्का मारल्याबद्दल सहस्रावधि हिंदूंचे बळी घेणारा अत्याचारांचा अग्नि एक समाज पेटवूं शकतो. आणि आम्ही आंधळ्या न्यायदेवतेच्या पायाशीं 'वैध' मार्गानें नाक घाशीत बसणारे नादान हिंदु तुझ्यासारख्या सहस्रावधि मानवांशीं तुल्यतेज असणाऱ्या कर्तव्यरत नेत्याच्या निर्घृण हत्येबद्दल नुसते बोटें मोडीत बसतों ! काय तुझ्या त्यागाचें फल ? धिक्कार असो आमच्या नीच कृतघ्नतेला ! ! पण थांब, हिंदु समाजाला सामर्थ्यशाली बनविण्याच्या आकांक्षा अतृप्त राहिल्यानें घुटमळणाऱ्या अमुक्त आत्म्या ! जरा धीर धर ! आतां आमचे डोळे हळू हळू उघडूं लागले आहेत; तुझ्या हत्येचा प्रतिशोध घेणें हें आमचें कर्तव्य आहे

ह आम्हांस समजून चुकलें आहे. आणि त्या कर्तव्यपालनाचा मार्गहि पण आमच्यापुढें सूर्यप्रकाशाइतका सुस्पष्ट आहे– हिंदु समाज सुसंघटित करून या खंडप्राय हिंदुस्थानांत हिंदूंचीच एकछत्री सत्ता स्थापन करणें. ज्या दिवशीं ती सुमंगल वार्ता सांगणारा सूर्य उगवेल त्याच दिवशीं हुतात्म्या स्वामी श्रद्धानंदांसारख्या शतावधि हिंदु धर्मवीरांच्या बलिदानाचें खरें चीज होईल; त्याचमुळें अशा सहस्रावधि हत्यांचा सूड आम्हीं घेतला असें ठरेल; आणि त्याच दिवशीं उगवलेल्या सूर्याच्या प्रकाशांत आजवरचे आमचे राष्ट्रीय हुतात्मे मुक्तता पावतील.

(स्वामी श्रद्धानंद हत्यादिन, २०–१२–४०)

* * *

## 'मामनुस्मर युद्ध्य च'

श्रीमद् भगवद्गीता-जयंतीच्या वातावरणानें काल, आज निं उद्यांचा भारतवर्ष दुमदुमून राहिला आहे. श्रीशिवछत्रपतींपासून कर्मवीर लोकमान्य टिळक नि आज स्वातंत्र्यवीर सावरकर यांचेपर्यंत सारे राष्ट्रोद्धारक ज्या गीतेच्या तेजस्वी शिकवणीनें हिंदु समाज जागृत करूं शकले तीच शिकवण भारताच्या सर्वांगीण उन्नतीला कारणीभूत होणारी आहे हें निःसंशय. "स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः" आणि 'स्वकर्म' कोणतें हें कळण्याइतपत हिंदुमात्र आतां जागा झाला आहे. हिंदु समाज जेणेंकरून बलवान्, ओजस्वी, तेजस्वी नि स्वतंत्र होईल असें कार्य करणें हेंच प्रत्येक हिंदूचें 'स्वकर्म' नव्हे काय ? (१०–१२–४०)

हा उपदेश नाहीं नि व्याख्यानबाजी तर नाहींच नाहीं; अगदीं रोकडा, प्रत्यक्ष नि सत्य व्यवहार आहे हा. ख्रिस्त्यांनीं एका हातांत बायबल ठेवून बागनेटाच्या जोरावर धर्मविस्तार केला. कुराण हातांत घेऊन दुसऱ्या हस्तांतील खड्गानें सारें जगच इस्लाममय बनवावयास निघालेले महंमदीहि जगाच्या चांगले परिचयाचे आहेत. पण आम्हां

हिंदूंना मात्र गीतेचें तत्त्वज्ञान कोणावर लादण्यासाठीं खड्गाचा आश्रय करावयाचा नसून आमच्या उत्कर्षपथावर आडव्या पडणाऱ्या विरोधकांचाच समाचार घेण्यासाठीं आम्हीं खड्ग हातीं धरलें तर धरूं. कोणाचें स्वातंत्र्य हिरावून घेण्यासाठीं वा कोणाला जुलमानें आमच्या पवित्र धर्मांत ओढण्यासाठीं आमची ही चाल नाहीं. मात्र आमचा रस्ता कोणीं स्वजनांनीं वा परजनांनींहि अडवूं नये. कारण भगवान् श्रीकृष्ण ज्या रस्त्यानें गेले तोच मार्ग 'मामनुस्मर' या न्यायानें त्यांचें स्मरण करीत करीत अनुसरणें आम्हांस प्राप्त आहे. मग त्यासाठीं लढावें लागलें तरी 'युद्धय च' असा आदेशहि श्रीकृष्णांनीं आम्हांस देऊन ठेवला आहे. मग प्रत्यक्ष भगवंतांनींच दिलेला हा संदेश आपण हिंदूंनीं नको का मानायला ? (गीताजयन्ती, २५-२-४१)

* * *

## ही घातक परंपरा इथेंच थांबली पाहिजे

'ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या बळकट रक्षणाखालीं असलेल्या नि लोकसंख्येंत शेंकडा ९६ प्रमाण असलेल्या मद्रास इलाख्यांतील हिंदूंना संघटित होण्याची काय आवश्यकता ?' या सरळ प्रश्नाचें सरळच उत्तर मदुरेंतील मुसलमान भाईंनीं दि. ११ ला मध्यरात्रीं दिलें आहे; त्याचें सर्व हिंदूंनीं अवश्य मनन करावें. १०० सशस्त्र मुसलमान ऐन मध्यरात्रीं एका हिंदुवस्तींत घुसले नि त्यांनीं पांच हिंदूंना भोसकून जखमी केलें. त्यांतील अठ्ठावीस वर्षें वयाचा एक तरुण हिंदु ठार झाला असून दुसरा अत्यवस्थ आहे. या खुनी, अत्याचारी टोळीचा सुगावा लागल्याचें अद्यापि कळत नाहीं !

काय चमत्कार पाहा ! प्रत्यहीं एकदोन तरी निरपराध हिंदु इस्लामी सुऱ्याला बळी पडत असतांना, हिंदु देवतांच्या मूर्ति फोडल्याचा प्रकार दैनिक चालू असतांना, एकाददुसरी तरी हिंदु स्त्री मुसलमानी गुंडांनीं पळवून नेल्याचें वृत्त दरदिवशीं ऐकत असतांनासुद्धां 'हिंदूंवर इस्लामचे अत्याचार होत नाहींत' असें म्हणणारे हिंदूच पुढें यावेत

पापरती दुसरी कोणती विपरीतावस्था असणार ! का असेंच समजा-श्याचें, कीं जेव्हां प्रत्येक हिंदूच्या घराला इस्लामची ही चूड आग लावील; हिंदुमात्राच्या रक्ताचा अखेरचा थेंब संपेल नि हिंदु म्हणून जें जें कांहीं त्याचें नांवनिशाणहि पृथ्वीतलावर उरणार नाहीं; तेव्हां आम्ही —अर्थात् परलोकांत— जागे होऊं ? अजून वेळ गेली नाहीं. 'It is never too late to mend.' लक्षांत ठेवा, राष्ट्रांचीं सहस्रशः वर्षांचीं भवितव्यें ठरविण्याच्या या कालांत आपण राहात आहोंत; नि त्या जगाचें एक तत्त्व असें आहे कीं, संरक्षक धोरण हें पराभवाकडे धांवणारें धोरण असतें ! मुसलमानी अत्याचाराच्या पहिल्या तडा-क्यांत हिंदूंतील कांहीं मोहरे गमावण्याची ही घातक परंपरा आतां इथेंच थांबली पाहिजे. (मदुरेंतील अत्याचार, १८-२-४१)

* * *

## ही मात्रा तर घेऊन पाहा !

होळीची खुसखुशीत पोळी खाऊन भरल्या पोटावर प्रेमानें हात फिरवीत जेव्हां हिंदु समाजांतील सुखवस्तु वर्ग आपल्या कुटुंबीयांशीं गप्पागोष्टी करीत बसला असेल त्या वेळीं पेशावर, अमृतसर, डाक्का इत्यादि ठिकाणचे त्यांचे हिंदु बांधव कोणत्या परिस्थितींत सांपडले होते ? मुसलमानांकडून जाणूनबुजून करण्यांत आलेल्या आगळिकीनें पेटलेल्या दंग्याच्या होळींत त्यांपैकीं कित्येकांचीं शरीरें नि घरेंदारें पेटत होतीं. पण मुसलमान दंगा कसा करितात, त्यांत हिंदूच कसे मार खातात नि अखेर सरकारी न्यायदेवतेच्या कांट्याचा तोल कोणत्या बाजूला झुकतो हें का नवीन सांगायला पाहिजे ? आजवर दशकानुदशकें घडत आलेल्या परंपरेला, चालत आलेल्या मारखाऊ धोरणाला, अजूनहि आपण हिंदु लोक झुगारून देऊं शकत नाहीं. तें पायाच्या ठोकरीसरशीं नि मनगटांतील शक्तीच्या फटक्यासरशीं दूर भिरकाऊं शकत नाहीं. याचा अर्थ—? — पण याचा अर्थ मीं न सांगितलेला बरा; आणि जोंवर 'न्यूनगंड' या नांवाचा जो एक रोग

हिंदूंच्या शरीरांत घर करून बसला आहे तोंवर तो कडक अर्थ पचविताहि येणार नाहीं हिंदु समाजाला ! म्हणून म्हणतों, ते सत्य-अहिंसेचे अंगारे नि हृदयपालटासाठीं दिलेले काढे बस्स झाले ! हिंदु-मुस्लीम ऐक्याच्या कल्पनेची अफूहि तुमचा रोग न घालवितां उलट वाढवीलच. तेव्हां आतां हिंदुसंघटनेची रामबाण मात्रा घेऊन पाहा. जरा कडक वाटेल प्रथम; पण तात्काळ गुण येऊन हिंदु समाजांतील राष्ट्रपुरुष खडखडीत बरा होईल. आणि पुन: एकवार आपले, दिग्विजयी सम्राटांच्या अन्यायाधिष्ठित सिंहासनाचा चक्काचूर उडविणारे, शक्तिशाली बाहू उचलून जगाला सांगेल.... ?

(हुताशनी, २१-३-४१)

*　　*　　*

## उद्यांचा स्वातंत्र्यदिन

उद्यां स्वातंत्र्यदिन—म्हणजे १८५७ च्या १० मेला प्रारंभ झालेल्या स्वातंत्र्ययुद्धाचा स्मृतिदिन ! स्वातंत्र्याचा स्मृतिदिन ! किती विसंगत नि भेसूर कल्पना ही ! लक्षावधि देशभक्तांनीं ज्यासाठीं आपलें रक्त सांडलें, सहस्रावधि राष्ट्रवीरांनीं ज्याच्याकरितां आत्मार्पण केलें, शेकडों हुतात्म्यांनीं ज्याच्या प्राप्तीसाठीं आपल्या सर्वस्वावर निखारा ठेविला, तें सत्य-शिव-सुंदर असें स्वातंत्र्य आपण गमावलें; अनेक वर्षे उलटून गेलीं तरी तें अजून आपण परत मिळवूं शकलों नाहीं. याचें कारण ? एकच—आपण एक सिद्धान्त विसरलों. राष्ट्रांचीं स्वातंत्र्यें परकीयांना हिसकावून घेतां येत नसतात, तर त्या त्या राष्ट्रांतील राष्ट्रिकच स्वार्थासाठीं तें स्वातंत्र्य परकीयांच्या पदरांत टाकीत असतात. मग त्या प्रसंगीं ध्यावयासच आलेल्यानें आपली झोळी अधिक पसरली तर त्यांत नवल तें कोणतें ?

जोंपर्यंत समष्टिजीवनाची जाणीव होऊन राष्ट्रांतील प्रत्येक घटक व्यक्तीनें तदनुसार आचरण करावयास प्रारंभ केला नाहीं तोंपर्यंत राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या गप्पा फोल आहेत. जगावर अशा एकादि

राष्ट्राचा उज्ज्वल इतिहास दाखवितां येणार नाहीं, कीं जो समष्टि-जीवनाच्या उदात्त ध्येयावर अधिष्ठित नाहीं. हिंदु समाजाचा विराट् वृक्ष उन्मळून पडतो कीं काय, अशी जी भयानक अवस्था प्राप्त झालेली आज आपण पाहतों तिचें मूलकारण एकच– आमच्यांतील समष्टिजीवनाचा अभाव ! वैयक्तिक तामस स्वार्थापासून संस्थागत सात्त्विक स्वार्थापर्यंत जो जो फुटीरपणा तो तो समष्टिजीवनाला विघातक, अतएव राष्ट्रीय कल्याणाला मारक ठरला, याचीं उदाहरणें हिंदु साम्राज्याच्या अंतकालापासून कालपर्यंत घडलीं; दुर्दैवानें आजहि घडत आहेत.

आपल्या व्यक्तिगत मानासाठीं वा संस्थेच्या अभिनिवेशाकरितां आपल्या समाजहिताचा बळी द्यावयास सिद्ध असलेलीं माणसें आज आपल्या समाजांत पुढारी, नेते, त्यागवीर म्हणून मिरवूं शकतात हें आपल्याला दिसतें का ? मी, माझें कुटुंब, जास्तींत जास्त म्हणजे माझी संस्था, येथपर्यंत आपल्या स्वाभिमानाची मजल जाऊं शकते; समाज नि राष्ट्र कांहीं गोष्ट आहे हें जणूं विसरूनच गेलों आम्ही !

हें नष्ट झालें पाहिजे; तत्काल नाहींसें केलें पाहिजे; हा राष्ट्रघातक स्वार्थ राष्ट्रीय यज्ञांत जाळून टाकिला पाहिजे. व्यक्ति, कुटुंबें नि झाडून सर्व लहानमोठ्या संस्था राष्ट्रासाठीं आहेत; प्रसंगीं त्यांनीं आपलें अस्तित्व राष्ट्रहितासाठीं नष्ट करून, होमून टाकण्यास हवें आहे.

असें घडलें, बहुसंख्य हिंदु समाज राष्ट्रीय कल्याणाच्या पवित्र भावनेनें राष्ट्रीय भगव्या ध्वजाखालीं संघटित झाला, त्या विराट् हिंदुराष्ट्रपुरुषाचें यथार्थ दर्शन जगाला झालें नि तो एकमुखानें बोलूं लागला म्हणजे मग कशाची उणीव ? परधर्मीयांचे हल्ले– जागच्या जागींच थंडावतील, स्वातंत्र्य मागावयास लंडनला जाण्याची आवश्यकता उरणार नाहीं, तें मग आमचेंच आहे. आणि हें इथेंच संपत नाहीं. आमचें हिंदुराष्ट्र स्वतंत्र झालें तरी तें स्वातंत्र्य लष्कराच्या

पाशवी बळावरच केवळ आम्हांला टिकवून धरावयाचें नाहीं, तर साऱ्या मानवजातीचें देवसंघांत रूपान्तर करण्याची उदात्त कल्पना तेजस्वी हिंदु संस्कृतीच्या साहाय्यानें आम्हांला प्रत्यक्षांत उतरवावयाची आहे. अध्यात्मनिष्ठ हिंदु संस्कृतीच्या एकनिष्ठ उपासकांचा असा दृढ विश्वास आहे कीं, हें रमणीय स्वप्न आम्हांला नाहीं तरी निदान आमच्या पुढील पिढ्यांना खरें झालेलें दिसेलच दिसेल.

पण हें सारें घडावयाचें तर आपण सर्व हिंदूंनीं एकच कृति करण्याची आवश्यकता आहे. नि ती म्हणजे त्या एकमेव राष्ट्रीय संघटनेंत आपलें व्यक्तित्व, मीपणा, माझें म्हणून जें जें तें तें सर्व विलीन करून टाकणें. (स्वातंत्र्यदिन, ९-५-४१)

REFBK-0006714

ग्रंथ संग्रहालय ठाणे
६०७४

# मङ्गल साहित्य प्रकाशन : २

[ संचालक :— अमरेन्द्र गाडगीळ ]

प्रवासी राम. भारतमातेचें अंतरंग पाहूं इच्छिणारा राम. तो आपले अनुभव सांगत आहे. आपले विचार मांडीत आहे. त्याची फक्त एकच दृष्टि. प्रकाशाचा झोत सोडावा. त्यांत जें दिसेल तें सांगावें. अशा उद्देशानें राम निघाला. त्याची आगनाव फुटली. अथांग हिंदुभूमीलाच त्यानें आपलें घर मानलें. अफाट समाजसमुद्रालाच त्यानें आपलें कुटुंब कल्पिलें. तो स्वतः नष्ट झाला. स्वतः मरून समाजरूपांत जन्मला.

...त्या रामचे विचार— "समाजाच्या कल्याणासाठीं आमचे देह खर्ची पडोत. आमचीं क्षणभंगुर शरीरें कामीं येवोत....त्या खर्चं होण्यांतच त्यांची वाढ आहे. त्याकरितां आमचें व्यक्तित्व पतन पावो. तें पतन हेंच उत्थान आहे. कामीं येणारें, खर्ची पडणारें, पतन पावणारें, नष्ट होणारें, लय पावणारें जीवन हें व्यक्तीचें जीवन. त्यांतून समाजाचें जीवन जन्म घेतें. उत्थान पावतें. परमोत्कर्षाला चढतें. .."

## प्रवासी राम

दुसरें प्रकाशन. ले. अमरेन्द्र.

मुख्य विक्रेते— अभिनव पुस्तकमंदिर,
फर्ग्युसन मार्ग, आम्बराई, पुणें ४.